मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०६ ■ बुधवार, २४ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# नवीन वर्ष २०२६ साठी श्री स्वामी समर्थ कॅलेंडरचे भक्तिमय वातावरणात अनावरण

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई प्रतिनिधी विभाग प्रमुख :** दरवर्षीप्रमाणे यंदाही आकृती आर्टचे मालक श्री. आशिष खांडेकर यांच्या वतीने नवीन वर्ष २०२६ साठी श्री स्वामी समर्थ यांचे भव्य व आकर्षक कॅलेंडर प्रकाशित करण्यात आले. या कॅलेंडरचे औपचारिक अनावरण शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी जोगेश्वरी येथील श्री स्वामी समर्थ मठात अत्यंत भक्तिमय व मंगल वातावरणात पार पडले.

या प्रसंगी मठात सकाळपासूनच स्वामी भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. स्वामी समर्थांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाच्या वेळी स्वामी समर्थ मठाचे गुरुजी, मठाचे सचिव श्री. शाम शिंदे, आकृती आर्टचे मालक श्री. आशिष खांडेकर, श्री. गुप्ता साहेब, श्री सदानंद सावंत,श्री. चंद्रकांत सागवेकर, श्री. अशोक मेवाडा यांच्यासह अनेक मान्यवर आणि मोठ्या संख्येने स्वामी भक्त उपस्थित होते.





आकृती आर्टतर्फे प्रकाशित करण्यात येणारे हे कॅलेंडर गेल्या सलग १५ वर्षांपासून अखंडपणे स्वामी भक्तांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिले जात आहे, ही या उपक्रमाची विशेष बाब ठरली आहे. दरवर्षी हे कॅलेंडर अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांच्या पवित्र चरणी विधीपूर्वक अर्पण केल्यानंतर कोणताही व्यावसायिक हेतू न ठेवता मोफत स्वरूपात स्वामी भक्तांमध्ये वितरित करण्यात येते. त्यामुळे या कॅलेंडरला भक्तांमध्ये विशेष मागणी आणि भावनिक जिव्हाळा आहे.

या कॅलेंडरमध्ये स्वामी समर्थांचे मनोहारी चित्र, तिथी, सण-उत्सव, धार्मिक दिनदर्शिका तसेच भक्तांसाठी उपयुक्त माहिती देण्यात आली असून ते श्रद्धा व संस्कार जपणारे ठरत आहे. या उपक्रमामुळे स्वामी भक्तांमध्ये समाधान, श्रद्धा आणि भक्तिभाव अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते.

यावेळी बोलताना श्री. आशिष खांडेकर यांनी सांगितले की, “स्वामी भक्तांच्या सेवेतून मिळणारे समाधान हाच या उपक्रमामागील खरा उद्देश आहे. स्वामींच्या कृपेने हा उपक्रम अविरत सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे.”

उपस्थित मान्यवरांनी या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे भरभरून कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’ जाहीर

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** भारतीय चित्रपटसृष्टीचे दिग्गज आणि ‘भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक’ म्हणून ओळखले जाणारे दादासाहेब फाळके यांच्या नावाने दरवर्षी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘दादासाहेब फाळके अवॉर्ड-२०२५’ यावर्षीही भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे जाहीर झालेल्या या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांची निवड करण्यात आली आहे.या पुरस्कार सोहळ्यात रोहिणी हट्टंगडी, विजय पाटकर, अरुण नलावडे, वर्षा दांदळे, गिरीश ठापर, विलास बडे, उस्ताद मकबूल हुसेन खान, सुनील गोडबोले आणि दिलीप सेन, जावेद हैदर, चित्रपट- कुर्ला टू वेंगुर्ला ची

**सुप्रसिद्ध अभिनेत्री: वीणा जामकर नवोदित**


दिग्दर्शक: विजय कलमकर यांच्यासह अनेक मान्यवर कलाकारांचा गौरव करण्यात येणार आहे. अभिनय, दिग्दर्शन, संगीत, कला आणि सांस्कृतिक




योगदानाच्या आधारे या कलावंतांनी दिलेल्या अनमोल कार्याची दखल घेत यंदाचे अवॉर्ड ठरविण्यात आले आहेत.दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही भारत सरकारकडून नोंदणीकृत संस्था (अजित म्हामुणकर - राष्ट्रीय अध्यक्ष) असून ,अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली ‘Appreciation to the Creation’ या उद्दिष्टाने गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटसृष्टीत कार्यरत व्यक्तींना प्रोत्साहन देत आहे. २०२५ चा अवॉर्ड सोहळा अधिक भव्य, अधिक समृद्ध आणि कलावंत-केंद्रित करण्याचा युनियनचा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वर्षीचा कार्यक्रम रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, सिद्धिविनायक मंदिराजवळ, मुंबई येथे उत्साहात पार पडणार आहे. रसिक, कलावंत आणि नागरिकांसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून ‘Register Now – 81081 48889’ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.चित्रपटसृष्टीतील अनुभवी तसेच नवोदित कलाकारांसाठी हा पुरस्कार एक मोठा सन्मान मानला जातो. दादासाहेब फाळके यांच्या स्मृती कायम ठेवत भारतीय चित्रपटजगताचा जागतिक स्तरावरचा लौकिक वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे.युनियनतर्फे पुढील काही दिवसांत आणखी काही नामांकित कलाकारांची नावे जाहीर होण्याची शक्यता आहे.

नागरिकांना आणि चाहत्यांना कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी युनियनच्या अधिकृत संकेतस्थळाला www.dspcunion.com भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# वाशी हवेली रा.जि.प.शाळा व अंगणवाडी नवीन ईमारतींचे महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नितीन लोखंडे/ तळा :** तालुक्यातील वाशी हवेली रा.जि.प शाळा नवीन बांधकाम व नवीन अंगणवाडी इमारतीचे उद्घाटन सोमवार रोजी महिला व बालकल्याण मंत्री अदिती ताई तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला ग्रामस्थांनी ढोल ताशांच्या गजरात मंत्री आदिती ताई तटकरे यांचे जंगी स्वागत केले. या कार्यक्रमाकरीता तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील, गटविकास अधिकारी श्री. शिंदे, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती. शेळके, शिक्षणाधिकारी श्रीमती. तांबट, मंडळ अधिकारी श्रीमती. खाडे, तलाठी श्री. रमेश नांगरे, ग्रामसेविका श्रीमती. धोत्रे, अंगणवाडी स्वयंसेवीका, मदतनीस, शिक्षक वर्ग, मुख्याध्यापक, विद्यार्थी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रायगड जिल्हा मागासवर्गीय सेल अध्यक्ष ॲड. श्री उत्तम जाधव, तळा उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, तळा पंचायत समिती माजी उपसभापती श्री गणेश वाघमारे, रा. काँ. पार्टी तळा तालुका अध्यक्ष श्री नाना भौड, तालुका महिला अध्यक्ष श्रीमती जानवी



शिंदे पक्षाचे पदाधिकारी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या या ठिकाणी इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शाळा असल्यामुळे वर्गखोल्यांची गरज होती. आज मला मनापासून आनंद होत आहे. या इमारतींमध्ये सुसज्ज चार वर्ग खोल्या, आणि सुसज्ज अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यात आले आहे. ज्यावेळी मी राज्यमंत्री होते त्यावेळी तालुक्यातील काही आदर्श शाळा आदर्श इमारत करण्याकरता 50 लाखापेक्षा जास्तीचा निधी मंजूर करून आणला होता. या इमारतींचे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले होते. कार्यक्रमामध्ये मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गरोदर स्तनदा मातांना बेबी किटचे वाटप देखील करण्यात आले. तालुक्यातील शाळा आणि अंगणवाडी मध्ये सर्वात जास्त पटसंख्या असलेली शाळा वाशी हवेली आहे. या शाळेची अंगणवाडीची पटसंख्या टिकून ठेवण्याचे श्रेय येथील ग्रामस्थ ग्रामपंचायत पालकवर्ग आणि शिक्षक यांचे आहे. ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण देऊन सुक्षित पिढी घडवणे हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. शाळा तसेच अंगणवाडी डिजिटल होण्याच्या दृष्टीने त्याला लागणारे डिजिटल किट आमच्याकडून उपलब्ध करून देण्यात येतील याचा उपयोग विद्यार्थ्यांनबरोबर शिक्षकांनासुध्दा होईल असे सांगण्यात आले. आपल्या सर्व समाजाच्या ग्रामस्थांच्या मिळालेल्या पाठबळामुळे या गावामध्ये खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून बरीचशी विकास कामे करता आली.

महिलांनी दिलेल्या निवेदनाकरीता तटकरे साहेबांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. एमएमबी च्या सुरू असलेल्या कामाला अधिक गति देण्यात येईल. शाळेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने तसेच आयोजित केल्याबद्दल मंत्री महोदयांनी आयोजकांसह ग्रामस्थांचे आभार मानले.

## उरण तालुक्याचे समाजसेवक श्री . मनोज ठाकूर द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**उमाकात पानसरे :** वनवासी कल्याण आश्रम उरणचे अध्यक्ष रोटरी क्लब चे पदाधिकारी आणि उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे ऑफिस बेअरर आणि अनेक अशा विविध सामाजिक संघटनांच्या पदावर असणारे श्री मनोज जगन्नाथ ठाकूर उरण शहर आणि उरण तालुका परिसरात नेहमी समाजसेवेत अग्रेसर असतात अगदी समाजातील शेवटच्या घटका पर्यंत जाऊन त्यांच्या सेवेत समरस होऊन समाजसेवेत त्यांचं कार्य अवघ्या रायगड जिल्ह्यामध्ये मर्यादित नसून राज्य पातळीवर सुद्धा त्याची दखल घेण्यात आलेली आहे, परिणामी अशा व्यक्तिमत्त्वाचा सन्मान उरण तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या *जिल्हास्तरीय द्रोणागिरी भूषण पुरस्कार*- 2025 या कार्यक्रमात दिनांक 22 /



12 / 2025 रोजी त्यांच्या कुटुंबीयांसोबत त्यांना प्रदान करण्यात आला अत्यंत भव्य असणाऱ्या या कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे नेते आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी सुद्धा श्री मनोज ठाकूर यांचे कौतुक करून त्यांच्या पुढच्या वाटचालीस मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत . त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनच्या सर्व सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे आणि ते मनोज ठाकूर यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव करीत आहेत.

## पुष्पक नगरचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या मार्फत पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो 2025 चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्तांसाठी पुष्पक नगर निर्माण होत आहे. मात्र विमानतळा शेजारी असून सुध्दा पुष्पक नगरचा प्रचार व ज्या प्रकारे प्रचार व प्रसार व्हायला हवा होता तसा झालेला नसल्याने येथील स्थानिक भूमिपूत्र व त्यांच्या सोबत काम करणारे बांधकाम व्यवसायिक यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या सर्व समस्या सोडविण्यासाठी दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष




सुनिल काशिनाथ कटेकर यांनी पुढाकार घेवून पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो 2025 चे आयोजन केले असल्याची माहिती आज काळभैरव मंदिर, आर 3, चिंचपाडा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिले .

या पत्रकार परिषेदेला बांधकाम व्यवसायिक अनिल सिंघवी , नागेश सुरवसे , सुनिल काशिनाथ कटेकर, संतोष सुतार आदी मान्यवर उपस्थित होते .

सदर पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो 2025 हे २२ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान रोटरी पनवेल फेस्टिव्हल, कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी , पनवेल येथे करण्यात आले असून पुष्पक नगर हे आगामी काळात सर्वाधिक गतिमान आणि प्रतिष्ठित ठिकाण म्हणून ओळख होणार असून जास्तीत जास्त लोकांनी येथे आपली घरे घ्यावीत यासाठी पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो 2025 चे आयोजन केले असल्याची माहिती सुनिल काशिनाथ कटेकर यांनी दिली . आगामी काळात सिडकोसह इतर शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून या भागाचा विकास होणार आहे . पुष्पक नगर ही वेगळी ओळख लोकांना दिसणार आहे . विमानतळापासून हाकेच्या अंतरावर हे नगर असल्याने लोकांना याठिकाणी राहण्यास आवडणार आहे . या भागातील प्रकल्पग्रस्त बांधकाम व्यवसायिक याना बरोबर घेऊन हे पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो 2025 चे आयोजन केल्याची माहिती अनिल सिंघवी यांनी दिली . तरी जास्तीत जास्त पनवेलवासीय व नवीमुंबई परिसरातील नागरिकांनी या प्रॉपर्टी एक्सपो 2025 मध्ये सहभाग घेवा . असे अहवाहन संतोष सुतार यांनी केले आहे .

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला परराज्यातील सहलीचा आनंद

### अंभोरा शाळेचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी :** ग्रामीण भागात उपक्रमशील शाळा म्हणुन परिचित असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अंभोरा या शाळेची सहल नुकतीच गुजरात राज्यात स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे गेली. बीड जिल्ह्यातील गुजरात राज्यात जाऊन स्टॅच्यू ऑफ युनिटी पाहणारी ही पहिलीच प्राथमिक शाळा असल्याचा मान अंभोरा शाळेला मिळाला आहे. या अभिमानास्पद उपक्रमातून विद्यार्थ्यांना सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याची, देशएकतेची आणि राष्ट्रीय वारशाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली.

या शाळेची तीन दिवसीय सहल त्र्यंबकेश्वर, नाशिक येथील पांडवलेणी, बटरफ्लाय गार्डन, रामकुंड, सीता गुफा, काळाराम मंदिर, सप्तशृंगी गड सापुतारा, उनाइ माता मंदिर व तेथील गरम पाण्याचे झरे, पोइचा येथील नीलकंठ धाम मंदिर परिसर,



कुबेर मंदिर, नर्मदा नदी बोटिंग आदी परिसर भेट देत स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे गेली होती. त्याठिकाणी सरदार वल्लभ भाई पटेल यांचा जगामध्ये सर्वात उंच पुतळा, त्यातील विविंग गॅलरी आणि परिसर, सरदार सरोवर प्रकल्प, मेज गार्डन, युनिटी ग्लो गार्डन, न्यूट्रिशन पार्क, जंगल सफारी पाहत अनेक नैसर्गिक, ऐतिहासिक, दुर्मिळ वारसा असणारे, जंगली प्राणी, पक्षी, वनस्पती पाहून त्यांची माहिती घेण्यात आली. ही सहल केवळ पर्यटन न ठरता विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, नवचैतन्य आणणारी, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय अनुभव देणारी सोबतच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणपूरक विचार, आपला ऐतिहासिक वारसा आणि देशाच्या प्रगतीबद्दल अभिमान निर्माण करणारी ठरली.

अशा सहशालेय उपक्रमांमुळेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची दृष्टी व्यापक होवून, त्यांच्या स्वप्नांना नवे पंख मिळतात. कल्पक विचारांना दिशा मिळते. ज्ञानविश्व व्यापक होते. अनौपचारिक, आनंददायी शिक्षणाला बळ मिळते.

सहल यशस्वी करण्यासाठी पालक, शाळा व्यवस्थापन समिती आणि अंभोरा गावचे सरपंच व ग्रामपंचायत यांचे मोलाचे अर्थपूर्ण सहकार्य लाभले. या शाळेचे मुख्याध्यापक अशोक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक शिवाजी खुडे, अण्णासाहेब घोडके, शफीक खान, संतोष पवार, कविता सोनवणे, अनामिका शिंदे या शिक्षकांनी नियोजन करत, सहल यशस्वी करण्यासाठी कष्ट घेतले.

## पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ : रिपब्लिकन पक्षाकडून जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांची 'निवडणूक निरीक्षक'पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** आगामी 'पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६' साठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) सक्रिय झाली असून, निवडणुकीच्या नियोजनासाठी आणि महायुतीमधील समन्वयासाठी पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र चंद्रकांत गायकवाड यांची 'निवडणूक निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे कोकण प्रदेशाध्यक्ष प्रकाश मोरे यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली आहे.

**महायुतीत १० टक्के जागांची मागणी**

पनवेल महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व बळकट करण्यासाठी पक्षाने



यावेळेस महायुतीकडे (भाजप, शिवसेना-शिंदे गट, राष्ट्रवादी-अजित पवार गट) १० टक्के जागांचा वाटा मागितला आहे. या संदर्भात जागावाटपाची चर्चा करणे, योग्य उमेदवार निश्चित करणे आणि महायुतीमधील घटक पक्षांशी समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी नवनियुक्त निवडणूक निरीक्षक नरेंद्र गायकवाड यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

**कार्यकर्त्यांना एकजुटीचे आवाहन**

कोकण प्रदेशाध्यक्ष प्रकाश मोरे यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पदाधिकारी, शहर अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांना सुचित केले आहे की, गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षबांधणी अधिक मजबूत करावी. रिपब्लिकन पक्षाचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष या निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरणार असल्याचे संकेत यावेळी देण्यात आले. या नियुक्तीमुळे पनवेलमधील राजकीय हालचालींना वेग आला असून, इच्छुक उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तात्पुरती स्थगित कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू**

**संपादक नागपूर विभाग/नागपूर :** आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या अनुषंगाने केवळ महानगरपालिका क्षेत्र तसेच निवडणुका प्रलंबित असलेल्या नगरपालिका व नगरपरिषदांच्या हद्दीमध्येच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आलेली आहे.

या व्यतिरिक्त उर्वरित राज्यामध्ये पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही नियमितपणे सुरु आहे. आदर्श आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, वरील नमूद क्षेत्रांमध्ये पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही नियमानुसार पूर्ववत सुरू करण्यात येईल, असे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.महामंडळाविषयी कोणत्याही अफवा अथवा चुकीच्या माहितीवर मराठा बांधवांनी अगर सर्वसामान्य नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन श्री. देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## राजमाता अहिल्याबाई सेवा संस्था, कामोठे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हळदी-कुंकू समारंभासह ‘खेळ पैठणीचा’ या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** राजमाता अहिल्याबाई सेवा संस्था, कामोठे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हळदी-कुंकू समारंभासह ‘खेळ पैठणीचा’ या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांचा उत्साह, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक ऐक्य यांचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून घडले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले. महिलांना एकत्र आणणारे, त्यांच्यात आत्मविश्वास व सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे असे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या सुंदर उपक्रमासाठी संस्थेच्या सभासद विद्याताई तामखेडे व नाना मगदूम





यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनःपूर्वक अभिनंदन करत आभार व्यक्त केले.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने नेहमीच महिलांचा सन्मान राखला असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली आहेत. विद्याताई तामखेडे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांचाही पक्षश्रेष्ठी योग्य सन्मान करतील, असे त्यांनी नमूद केले. उमेदवारी देण्याचा अधिकार हा पक्ष नेतृत्वाकडे असून, योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कामोठ्यात आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर महिला आणि नागरिकांची उपस्थिती पाहायला मिळाली. समाजाच्या एकत्रीकरणासाठी आणि महिलांच्या सबलीकरणासाठी भाजपचे पदाधिकारी वर्षभर विविध उपक्रम राबवत असतात. अशा कार्यक्रमांमधून महिलांना ऊर्जा, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभागाची प्रेरणा मिळते, असे मतही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबवण्यात येत असून, त्याच धर्तीवर भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तळागाळात काम करत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह कामोठे शहराध्यक्ष विकास घरत, माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नेते रवी जोशी, युवा नेते हॅपी सिंग, माजी नगरसेवक विजय चिपळेकर के के म्हात्रे राजेश म्हात्रे सरस्वती कथारा तेजस जाधव हर्षवर्धन पाटील छाबा फाउंडेशनचे दामोदर चव्हाणतसेच अनेक मान्यवर आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब बुधे, कार्याध्यक्ष गणेश बेरगळ, उपाध्यक्ष पांडुरंग यमगर, सचिव कैलास सरगर , खजिनदार अशोक माने, सहसचिव अर्जुन गावडे विजय सरगर नानासाहेब बुधे किसन यमगर माणिक सरगर रावसाहेब कोळेकर एकनाथ हुबाळे विलास पुकळे सतीश सरगर उल्हास धायगुडे या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले.

**दैनिक युवक आधार**

हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR

Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# लाखो निसर्गप्रेमींच्या गळ्यातील ताईत असलेल्या 'रामबाग' उद्यानाचा वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि लाखो निसर्गप्रेमींच्या गळ्यातील ताईत असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील 'रामबाग' या अतिसुंदर उद्यानाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा हजारो नागरिकांच्या साक्षीने मोठ्या उत्साहात सोमवारी सायंकाळी साजरा झाला. नयनरम्य वातावरण, आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून युवक, महिला, ज्येष्ठांची उपस्थितीने रामबाग नंदनवन प्रमाणे फुलले होते. आणि त्यातच पारंपरिक आगरी-कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात स्फूर्ती आणली होती. स्वतःच्या संपत्तीतून लोकांच्या सेवेसाठी उभारलेली 'रामबाग' ही वास्तू न्हावे पंचक्रोशीतीलच नव्हे तर पनवेल, उरण, रायगड नवी मुंबई आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या गौरवाची ठरली आहे, विशेष म्हणजे 'रामबाग' आता पर्यटनस्थळ म्हणून उदयास आले आहे. थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि सर्व समाजाचे आधारस्तंभ असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावे आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि म्हसेश्वर मंदिर समिती आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला.



या सोहळ्याला खासदार धैयशील पाटील, माजी मंत्री व विद्यमान आमदार रवीशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री. म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सि. एल. ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्री. सत्यनारायण महापूजेचे हजारो नागरिकांनी दर्शन तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पप्पू सूर्यराव, स्टेप आर्ट इंटरटेन्मेन्ट निर्मित व सनी संते प्रस्तुत 'हिच खरी आगरी कोळ्यांची दौलत' या पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने आणखी रंगत आणली होती. रामबागला भेट देणाऱ्यांना समाधान आणि त्यांच्या चेहऱ्यावर मनमुराद आनंद दिसतो. रामबागच्या रूपाने या परिसराला आणखी एक चांगली ओळख मिळाली. राज्यातून विविध भागातील लोकं या ठिकाणी आवर्जून भेट देत आहेत. अनेक उद्यानांना प्रवेश फी आकारली जाते मात्र रामबागेत प्रवेश विनाशुल्क आहे. या ठिकाणी प्रवेश मोफत असले तरी सुविधा मात्र दर्जेदार आहेत. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी 'स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग' म्हणून ओळखली जात आहे. दुबईतील 'मिरॅकल गार्डन' च्या धर्तीवर १४ एकर जागेत उभारलेल्या या 'रामबाग' उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी आहे. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. ती संख्या तीन वर्षात लाखोंच्या पलीकडे गेली आहे. कौटुंबिक, तसेच विविध कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मेजवाणीमुळे निसर्गाचा आस्वाद या ठिकाणी घेता येत आहे. तसेच विद्यमान व पुढील पिढीला सुंदर वास्तू आणि मोकळ्या हवेत आणण्याचे काम या निमित्ताने झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्राला रामबागच्या रूपाने हि एक चांगली पर्यटन वास्तू मिळाल्यामुळे या विभागाचे नाव मोठे झाले आहे.'रामबाग' हे उद्यान सर्वसामान्य नागरिकांसाठी एक आदर्श व प्रेरणादायी सार्वजनिक उद्यान म्हणून नावारूपास आले आहे.

आबालवृद्धांना आपलेसे वाटणारे हे उद्यान कोणतेही प्रवेश शुल्क न आकारता सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात मनःशांती मिळवण्याबरोबरच येथे आरोग्यदायी चालण्यासाठी योग्य मार्ग, मुलांसाठी आकर्षक खेळाची साधने तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी शांत, सुरक्षित आणि निवांत वातावरण उपलब्ध आहे. त्यामुळे 'रामबाग' हे उद्यान नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.

सामाजिक सलोखा आणि आरोग्यसंवर्धन यांचा सुरेख संगम येथे अनुभवायला मिळत असून, हे उद्यान सामाजिक बांधिलकीचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे.

> “ रामबाग शब्दाने या परिसराला दिशा देणारा मार्ग केला आहे आणि या रामबागेमुळे ग्रामीण भागात चैतन्य निर्माण केले आहे ते लोकनेते रामशेठ ठाकूर या दानशूर व्यक्तीमत्वाने. स्वतःच्या पैशाचा उपयोग ते जनतेच्या हितासाठी करतात. रामबाग हे या परिसराच्या नव्हे तर जिल्ह्याच्या अग्रस्थानी आहे. या परिसराच्या विकासाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी योगदान दिले आहे. या उद्यानाने आकर्षणाची सर्वांवर भुरळ घातली आहे, त्यामुळे दरवर्षी या ठिकाणी येत असतो. रामबाग हे निसर्गरम्य असे पर्यटन स्थळ आहे. लोकांसाठी उभारलेल्या या उद्यानाचा खर्च ते स्वतः करत आहेत त्यामुळे असे दानशूर व्यक्तिमत्व कुठेही भेटणार नाही. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा उपयोग गोरगरिबांच्या सेवेसाठी होत आहे, त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो हि सदिच्छा!
>
> - आमदार रवीशेठ पाटील

> “ लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जन्म आणि बालपण न्हावाखाडी झाले. गावाला काही तरी दिले पाहिजे या भावनेतून आणि ग्रामस्थ, म्हसेश्वर मंदिर कमिटीच्या संकल्पनेतून रामबागची उभारणी झाली. अटल सेतूमुळे हा भाग मुंबईशी जवळ जोडला गेला. निसर्गरम्य सौंदर्य या ठिकाणी असल्याने येथून ये जा करणाऱ्या लोकांना रामबागचे आकर्षण झाले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अविरतपणे सामाजिक कार्य सुरु आहे. या परिसराच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य लाभले आहे आहे आणि ते यापुढेही मिळत राहील.
>
> - आमदार प्रशांत ठाकूर

> “ लोकनेते रामशेठ ठाकूर हे दूरदृष्टी असलेले नेते आहेत. त्यांनी लोकांसाठी लोकसेवेचे साम्राज्य उभारले. लोकांसाठी दुबईच्या धर्तीवर असलेल्या मिरॅकल गार्डनची प्रतिकृती उभारली आहे. शाळा व्यवसाय म्हणून काही जण बघतात पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाचे जाळे गोरगरिबांसाठी केले आहे. ते शिक्षण महर्षी शिक्षण तपस्वी आहेत, त्यामुळे तो अभिमान आपल्यासाठी खूप मोठा वाटतो. माणसे आणि समाज तेच असतो पण माणसे जोडण्याची ताकद लागते त्यामुळे ते माणसे जोडणारे व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या मागे प्रचंड तपश्चर्या आहे आणि त्याचे सर्वजण साक्षीदार आहोत. जीवन तीन पानाचे असते. पहिले पान म्हणजे आपला जन्म जो ईश्वराने लिहून आपल्याला दिलेला असतो. तिसरे पान म्हणजे मृत्यू तो सुद्धा ईश्वराने आधीच निश्चित केलेला असतो. पण यामधील एक महत्त्वाचं पान आपल्या हातात असते ते म्हणजे मधले पान आपलं आयुष्य कसं घडवायचं, कसं जगायचं आणि काय मागे ठेवायचे हे ठरवणारे पान आहे. हे मधलं पान आपण कशा प्रकारे भरतो, यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची किंमत ठरते. काही लोक हे पान रिकामं ठेवतात, काही साध्या ओळीत भरतात, तर काही थोर व्यक्ती आपल्या कर्माने, विचाराने आणि कार्याने हे पान सुवर्णाक्षरांनी भरून ठेवतात. आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरभरून ठेवले असून त्याचा आदर्श त्यांच्याकडून घ्यावे लागेल.
>
> - बाळासाहेब पाटील, माजी सभापती - कोकण म्हाडा

> “ मी लहानपणापासून रामशेठ काकांना पाहिलेले आहे. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आपल्याला उपस्थितीत राहता येत आहे ते माझ्यासाठी भाग्य आहे. समाजामध्ये अनेक माणसे असतात कुणी राजकारणात यशस्वी असतो पण सामाजिक कार्यात नसतो. एखादा व्यवसायात यशस्वी असतो पण समाजकार्यात नसतो आणि एखादे समाजकार्यात यशस्वी असतो पण संस्थात्मक राजकारणात कुठेच नसतो आणि एखादा व्यक्ती या सगळ्यात असतो पण नातीगोती आणि माणसे सांभाळण्यात कमी असतो. परंतु सर्व क्षेत्रात यशस्वी आणि सर्व बाबींना स्पर्श केलेले एकमेव व्यक्तिमत्व आहेत ते म्हणजे रामशेठकाका. धनवान खूप आहेत पण आपले ऐश्वर्य लोकांच्या उपयोगी येईल याचा विचार ते करतात. १४ एकरच्या या जागेत कधीही झाडे उगवली नसतील ती उगविण्याची काम होत माणसाच्या आनंदाची इको सिस्टीम या ठिकाणी तयार झाली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आपल्या सर्वांसाठी आदर्श असून या विभागाचा ते कणा आहेत.
>
> - खासदार धैर्यशील पाटील

## शिवविचारांची शाळा : आवरे शाळेची प्रेरणादायी शिवनेरी सहल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड :** “आज झुकलो, तर उद्या गुलाम बनू – म्हणून झुकायचे नाही!” या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आव्हानात्मक विचारांची मशाल नव्या पिढीच्या हाती देण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आवरे–उरण यांच्यावतीने किल्ले शिवनेरी येथे प्रेरणादायी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान, त्यांचे शौर्य, स्वाभिमान व आदर्श मूल्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता यावीत, या उद्देशाने ही सहल राबविण्यात आली. सहलीत ४९ विद्यार्थी व ५ शिक्षक सहभागी झाले होते. सहलीची सुरुवात देहू येथील संत तुकाराम महाराज मंदिर दर्शनाने झाली. त्यानंतर ओझर व लेण्याद्री येथील अष्टविनायक दर्शनातून श्रद्धा, शिस्त व संस्कारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

किल्ले शिवनेरीवर बुरुज, दरवाजे, अंबरखाना व महाराजांचे जन्मस्थळ पाहताना विद्यार्थ्यांमध्ये अभिमान व राष्ट्रभक्ती जागृत झाली. पराक्रम, प्रामाणिकपणा, धर्मनिष्ठा व प्रजेबद्दलची जबाबदारी हे शिवविचार शिक्षकांनी प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. गडावर घुमलेल्या “छत्रपती शिवाजी महाराज की जय”च्या घोषणांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.ही सहल केवळ भ्रमंती नसून व्यक्तिमत्त्व घडविणारी ठरली. मुख्याध्यापक नरेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली छाया गावंड, समाधान पाटील, महेश गावंड व गणेशप्रसाद गावंड यांनी सहल यशस्वीरीत्या पार पाडली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष गावंड, सदस्य व पालकांनी समाधान व्यक्त केले. ही सहल म्हणजे विद्यार्थ्यांसाठी “शिवविचारांची जिवंत शाळा” ठरली, असे गौरवोद्गार यावेळी व्यक्त करण्यात आले.

## पुण्यातील तरुण मुलानंच्या ग्रुप कडून वावोशी विभागतील गरीब गरजू लहान मुलांना हुडीज जॅकेट वाटप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी खालापूर/संतोष शेवाळे :** यावर्षी थंडीचा पारा खूप वाढत आहे. थंडीपासून संरक्षण मिळावे, विद्यार्थी आजारी पडू नयेत, तसेच नियमितपणे शाळेत उपस्थित राहून त्यांचे शिक्षण सुरू राहावे, यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लहान मुलांना मायेची उब देण्यात आली आहे. श्री छत्रपती विद्यालय वावोशी, राजिप शाळा गोरठण बु,राजिप शाळा दांडवाडी, या शाळेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना हुडीज व जॅकेट्सचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम गौरव नहार, अक्षय जैन, अमित लोढा, सिद्धार्थ नहार, शुभम लुणावत, आकाश ओसवाल, गौरव बठिया, सुयोग बोरा व साहिल नहार यांच्या पुढाकाराने व राजेश नहार, सुभाष नहार, स्नेहल चोरडिया, निकिता नहार, पायल बोरा, यश नवलखा व




कौशभ धोका यांच्या सहकार्याने राबवण्यात आले.

याप्रसंगी श्री छत्रपती विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. डी. गावित सर राजिप शाळा गोरठण बु चे मुख्याध्यापक शेंडे सर राजिप शाळा दांडवाडीचे मुख्याध्यापक पाटील सर उपस्थित होते.

श्री छत्रपती विद्यालय व जुनिअर कॉलेज वावोशी चे इन्चार्ज श्री शेळके सर यांनी सर्व दानशूर मान्यवरांचे तिन्ही शाळांच्या वतीने आभार मानले.

## मेळघाट येथे ढगफुटीच्या घटनेत शहीद झालेल्या दोन CISF जवानांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची अतिरिक्त आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी. भोई/नवी दिल्ली :** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) ने भारतीय स्टेट बँक (SBI) यांच्या सहकार्याने जम्मू–काश्मीरमधील किश्तवाड येथे १४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या दुर्दैवी ढगफुटीच्या घटनेत प्राण गमावलेल्या दोन CISF कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना वैयक्तिक अपघात विम्याअंतर्गत १ कोटी रुपयांची अतिरिक्त आर्थिक मदत प्रदान केली आहे.




CISF चे उपमहानिरीक्षक (जनसंपर्क अधिकारी) सरोज भुंदे यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, दिनांक १४-०८-२०२५ रोजी ७ व्या रिझर्व बटालियन, किश्तवाड येथील प्रधान आरक्षक/जीडी आनंद कुमार आणि प्रधान आरक्षक/जीडी मनोज कुमार विशाल यांची विश्रांती गावामध्ये अंतर्गत सुरक्षा ड्युटीसाठी तैनाती करण्यात आली होती. ही तैनाती गुलाबगड ते मोलो माता मंदिरपर्यंत सुमारे ३१ किमी लांबीच्या तीर्थमार्गाच्या शेवटच्या टप्प्यावर होती.

कर्तव्य बजावत असताना अचानक आणि तीव्र ढगफुटीमुळे परिसरात भीषण पूरस्थिती निर्माण झाली. धोक्याची पर्वा न करता, या दोन्ही जवानांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता पर्यटकांची सेवा केली आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यासाठी मदत केली. त्यांच्या तत्परतेमुळे, शौर्यामुळे आणि कर्तव्यनिष्ठेमुळे अनेक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आणि निरपराध लोकांचे प्राण वाचवण्यात यश आले. दुर्दैवाने, या मानवीय कार्यादरम्यान दोन्ही जवान तीव्र पुराच्या प्रवाहात वाहून गेले आणि कर्तव्य बजावत असताना त्यांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांचे पार्थिव दोन दिवसांनी सापडले.देशभरातील ३६० हून अधिक महत्त्वाच्या संस्थांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारा CISF आपल्या सेवारत कर्मचाऱ्यांसह शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देतो. विद्यमान तरतुदींनुसार, CISF आणि गृह मंत्रालयाकडून सुमारे ६० लाख रुपयांची एकरकमी अनुदान रक्कम दिली जाते. याशिवाय, अतिरिक्त लाभ सुनिश्चित करण्यासाठी CISF ने भारतीय स्टेट बँक (SBI) सोबत सामंजस्य करार (MoU) केला आहे. या SBI–CISF योजनेअंतर्गत, शहीद कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना वैयक्तिक अपघात विम्याच्या स्वरूपात अतिरिक्त १ कोटी रुपये दिले जातात.

CISF मुख्यालयात आयोजित एका कार्यक्रमात CISF चे महासंचालक श्री. प्रवीर रंजन यांनी SBI चे अधिकारी – श्रीमती सुचित्रा जैन (उपमहाव्यवस्थापक – विमा), अरुण कुमार (प्रादेशिक व्यवस्थापक – RBO) आणि श्री. अभिषेक कुमार (मुख्य व्यवस्थापक, SBI CGO कॉम्प्लेक्स) यांच्या उपस्थितीत शहीद प्रधान आरक्षक/जीडी आनंद कुमार यांच्या पत्नी श्रीमती मधु शर्मा आणि शहीद प्रधान आरक्षक/जीडी मनोज कुमार विशाल यांच्या पत्नी श्रीमती सुमिता विशाल यांना SBI–CISF विमा लाभ प्रदान केला.

या प्रसंगी CISF चे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महासंचालकांनी शहीद जवानांच्या कुटुंबीयांचे स्वागत केले आणि त्यांच्या महान बलिदानाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

## पनवेलमध्ये जमावबंदीचा आदेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** निवडणूक आयोगाने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजीचे अधिसुचनेनुसार महानगरपालिका निवडणुक २०२५ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तायामधील नवी मुंबई महानगरपालिका पनवेल महानगरपालिका निवडणुकीकरीता २३ ते ३० डिसेंबर २०२५ रोजीपर्यत निवडणुक कार्यक्रमांतर्गत उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे.तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा २ जानेवारी २०२६ आहे. त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे. त्यानुसार पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मी नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील पनवेलमध्ये जमावबंदी आदेश जारी केले आहे.

# द . ग . तटकरे महाविद्यालय, तळा येथे विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा रायगड ग्रंथालय विभागामार्फत सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी ग्रंथालयात सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पुस्तक पेढी योजनेअंतर्गत गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव श्री मंगेश देशमुख, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. भगवान लोखंडे होते. यावेळी ग्रंथपाल श्री. मनोज वाढवळ, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथालय परिचर श्री मंगेश पोळेकर यानी सुद्धा ही योजना महाविद्यालयात राबविताना



खूप सहकार्य केले. तसेच यावेळी ग्रंथपाल श्री. मनोज वाढवळ यानी सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पुस्तक पेढी योजना गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाची असून त्यांनी १३७३ एवढी पुस्तके देऊन अंदाजे रक्कम २ लाख २० हजार ५५५ एवढी होत आहे. अशा या संस्थेचे अध्यक्ष /सचिव व आम्हाला सहकार्य करणारे मूरुटकर सर ,पाटील सर, रोकडे सर ,दया सर व इतर सहकारी या सर्वांचे आम्ही शतश : ऋणी आहोत अशा भावना व्यक्त केल्या. प्र. प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण असून आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. या पुस्तक वाटपामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणाला सकारात्मक चालना मिळाली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी पुस्तक दान करणाऱ्या संस्थेचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# देखभाल-दुरुस्तीसाठी आज शहराच्या विविध भागांत वीजपुरवठा खंडित राहणार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** शहरातील वीज यंत्रणेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि भविष्यातील तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी महावितरणतर्फे नियमित देखभाल व अत्यावश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे बुधवार, दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी शहरातील विविध भागांचा वीजपुरवठा ठराविक कालावधीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

या नियोजित कामांमुळे होणाऱ्या संभाव्य गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली असून, वीज ग्राहकांनी या काळात संयम राखून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे. या कामांमुळे महाल विभागात सकाळी 9 ते दुपारी 1 यावेळेत महालक्ष्मी नगर, प्रक्रिया सभागृह, म्हाळगी नगर, अष्टविनायक कॉलनी. सकाळी 7 ते 11 या वेळेत एनआयटी गार्डन, महाकाळकर सभागृह, बसवेश्वर पुतळा, मधुबन अपार्टमेंट, शिवाजी सभागृह, दत्तात्रय नगर, नवीन सुभेदार, समर्थ वाटिका परिसर. तर सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत जुनी मंगळवारी, धिवरपुरा, चंद्रशेखर आझाद चौक, स्वीपर कॉलनी, हत्तीनाला, हिरा प्लाझा परिसरातील वीज पुरवठा बंद राहील

कॉंग्रेसनगर विभागात सकाळी 8 ते 12 या वेळेत गिरीपेठ, वसंतराव नाईक वसाहत, गवळीपुरा, पोलीस विभाग, ट्रॅफिक पार्क, सकाळी 8 ते 11 या वेळेत दंडीगे लेआउट, शंकरनगर, सकाळी 8 ते 10 या वेळेत चितळे मार्ग धंतोली, दगडी पार्क रामदासपेठ, सकाळी 8 ते 9 या वेळेत छोटी धंतोली सकाळी 8 ते 9:30 या वेळेत विश्वनाथ अपार्टमेंट, धंतोली, विश्वनाथ अपार्टमेंट, धंतोली, सकाळी 9 ते 11 या वेळेत रेल्वे स्टेशन मार्केट, टेकडी लाईन, एअर फोर्स ऑफिस, फिश मार्केट हिंदुस्थान कॉलनी, समर्थ नगर, गजानन नगर या भागात तर सकाळी 9 ते 12 या वेळेत जय बद्रीनाथ सोसायटी, स्वागत सोसायटी, मनीष लेआउट, दुपारे लेआउट, पाटील लेआउट, भेंडे लेआउट, राऊत वाडी गायत्री नगर, परसोडी, दत्त मंदिर, हनुमान मंदिर परिसर, गोपाल नगर गल्लि क्रमांक 69, नाईक लेआउट मंदिर गोपाल नगर, टेलीकॉम नगर, स्वावलम्बी नगर, फ्रेंड्स कॉलनी, रवींद्र एनगर, गावंडे लेआउट, पायोनियर सोसायटी, स्वरूप नगर, सुभाष नगर, नेल्को सोसायटी, जोशी लेआउट, कामगार कॉलनी, तुकडोजी नगर, हॉस्पिटल लेआउट, शालेयनगर हॉस्पिटल, कन्नमवार नगर, कर्वे नगर, उज्ज्वल नगर ,कॉस्मो सोसायटी, पर्यावरण नगर, पावनबुमी, सावित्री विहार, श्रीरामनगर, डिगोलिस सेंटर, सोमलवाडा चौक, वंदना अपार्टमेंट, तर सकाळी 9 ते दुपारी 2 या वेळेत शुभांगी नगर,श्रीधर, वेंकटेश सिटी,गौरी मिडास, आयटीआय कॉलनी, निवास सोसायटी, सिताबाई घाट या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

सिव्हिल लाईन्स विभागात सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत पेन्शन नगर, नेहरू कॉलनी, रामदेव बाबा कॉलेजचा मागील परिसर, वर्मा फ्लोअर मिल, नंदनवन क्लासिक अपार्टमेंट, सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत मानकापूर चौक, पोस्ट ऑफिस, मानकापूर जुनी वस्ती, म्हाडा कॉलनी, नागसेन सोसायटी, डॉ. आंबेडकर सोसायटी, शिवाजी कॉम्प्लेक्स, गाडगेबाबा सोसायटी, तर सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत सीपीडब्ल्यूडी क्वार्टर, कम्युनिटी हॉल, एसएफएस कॉलेज, एमईएस वॉटर पंप, मानवता नगर, टीव्ही टॉवर चौक या भागातील वीज पुरवठा बंद राहील याशिवाय बुटीबोरी विभागात (औद्योगिक क्षेत्र) बुटीबोरी येथील एमआयडीसी उपकेंद्रातून वीजपुरवठा होणाऱ्या वाहिनी क्रमांक 6 वरील 'ई-झोन'मधील काही औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी 10:30 बंद राहील.

दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याचा महावितरणचा प्रयत्न राहील. तरीही नागरिकांनी आपले पाण्याचे नियोजन व इतर महत्त्वाची कामे या वेळापत्रकानुसार आधीच आटोपून घ्यावीत आणि महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# "वेश्याव्यवसायातुन ०१ बांगलादेशी अल्पवयीन पिडीत मुलगी व ०६ पिडीत महिला (त्यापैकी ०२ बांगलादेशी) महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ,( वार्ताहर ) :** वेश्याव्यवसायातुन ०१ बांगलादेशी अल्पवयीन पिडीत मुलगी व ०६ पिडीत महिला (त्यापैकी ०२ बांगलादेशी) महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी सुटका केली आहे .

पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्याचे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, "तळोजा एम.आय.डी.सी. येथील हॉटेल



नवनाथ इन या लॉजिंगचा मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकाकडुन २०००/- रूपये घेवुन लॉजमधील रूममध्ये ठेवलेल्या महिला दाखवुन, त्या महिलांकडुन वेश्या व्यवसाय करून घेत आहे. वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॉटेल नवनाथ इन या लॉजिंग मध्ये पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ६ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मालक वसंत शेटटी, लॉज मॅनेजर गिरीश शेटटी, सर्व्हिस बॉय रोशन यादव यांनी अल्पवयीन मुलीस व पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवल्या. सर्व्हिस बॉय रोशन याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन २०००/- रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले. आरोपी वसंत गणेश शेटटी (लॉज मालक ,गिरीश विठठल शेटटी (लॉज मॅनेजर), रोशन रामजित यादव (सर्व्हिस बॉय) यांनी आपसात संगनमत करून ०१ अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व ०६ महिला पैकी ०२ बांगलादेशी पिडीत महिलांना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉजचा वेश्याव्यवसायासाठी वापर केला. म्हणून वरील ३ आरोपी विरूध्द भा. न्या.सं. कलम १४३ (३), १४३ (४), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३. ४, ५, सह POCSO कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे. सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी पृथ्वीराज घोरपडे, पोहवा मांडोळे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, पोशि कोलते, पोहवा सविता म्हात्रे, पोहवा मनिषा पावडे, चालक पोहवा हाडे यांनी केली आहे.

# थेपडे विद्यालयात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी/समाधान पाटील :** आज दिनांक 22 डिसेंबर 2025 रोजी स्वा. सै.पं .ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद ता. जि. जळगाव येथे राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. यात थोर भारतीय गणितज्ञ डॉ.रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या भाषण सादर केले. यावेळी व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक , कार्यक्रमाचे



अध्यक्ष श्री जी डी बच्छाव सर, उपमुख्याध्यापक एस के भंगाळे सर, शाळेचे पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर शिक्षक प्रतिनिधी एसडी चव्हाण सर, तसेच गणित विषय विभाग प्रमुख श्री. एन.के.अहिरे सर गणित विषय शिकवणारे सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती व्ही एम सूर्यवंशी मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणामध्ये थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनाविषयी गणित विषय मध्ये असणाऱ्या आवडी विषयी त्यांचे विचार सादर केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इयत्ता नववीतील विद्यार्थिनींनी केले . कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सर्व शिक्षकांनी सहकार्य कले.

# मा. रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले 2026 च्या वार्षिक कॅलेंडरचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नंदकिशोर धोत्रे चॅरिटेबल ट्रस्ट आणि तसेच पत्रकार संरक्षण समिती, अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती, वृत्तपत्र शिवानंद, मल्हार न्यूज, लायन्स क्लब ऑफ पनवेल, या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने तयार केलेले वर्ष 2026 च्या वार्षिक कॅलेंडरचे उद्घाटन पनवेल येथे, माजी नगरसेवक लोकप्रिय समाजसेवक आणि तरुणांच्या गळ्यातील ताईत अशी ओळख असलेले रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दादांनी अनुमोदन देताना दादांना बोलण्यात वेगळाच सूर गवसला होता. संपादक नंदकिशोर धोत्रे आणि त्यांच्या टीमला त्यांनी शुभेच्छा देत सर्वांचे कौतुक केले. व तसेच प्रसार माध्यमांशी बोलताना, माजी इलेक्शन अधिकारी टी एन शेषन यांचे बद्दल बोलत असताना, दादा म्हणाले की जी शेषन साहेबांनी नियमांची अंमलबजावणी केली होती तशी अंमलबजावणी पुढील अधिकाऱ्यांनी कडकरित्या अवलंबली नाही त्याबद्दल रमेश गुडेकर यांनी खेद व्यक्त केला.




तसेच सर्व राजकीय पक्षांवरही दादा घसरून पडले. त्यांच्या भाषणात आता पक्ष न राहता त्याचे पक्षी झालेले आहेत आणि हे पक्षी एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या घेत आहेत आणि इतर फांद्याही त्याचं स्वखुशीने स्वागत करत आहेत असे उपहासात्मक स्वतःचे मत सादर केले.

सर्वांना नवीन वर्षाच्या पुनश्च: शुभेच्छा देत आपले मनोगत संपविले. सदर कार्यक्रमांमध्ये पत्रकार गिरीश भोपी, गुरुनाथ धुमाळ, सौ. सुवर्णा ठाकूर अजित कर्णिक, सौ. नूतन धोत्रे तसेच डेरवली येथील दुर्गामाता महिला बचत गट यांच्या अध्यक्षा गीता भोपी व सभासद सौ. गायत्री धुमाळ, सौ. हिरा नायर त्याचप्रमाणे अनमोल खिल्लारी, चिंतामण कराळे, सौ. गौरी जयस्वाल, देवांश धुमाळ, संतोषी जयस्वाल यांची उपस्थिती होती.

# समान काम, समान वेतनाचे न्यायालय आदेश धाब्यावर; 'स्वयंसेवक' शिक्क्यामुळे सफाई कामगारांचे आयुष्य उद्ध्वस्त

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** "समान काम समान वेतन" असा सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश असतानाही मुंबई महानगरपालिकेकडून दत्तक वस्ती योजना व स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांवर अन्यायाची परिसीमा ओलांडली जात आहे. दुर्गंधीयुक्त कचरा उचलणे, गटार-नाले साफ करणे, घनकचरा व्यवस्थापन अशी अत्यंत धोकादायक व आरोग्याला घातक कामे करून घेत असतानाही या कामगारांना आजही 'स्वयंसेवक' म्हणूनच संबोधले जाते. परिणामी त्यांना किमान वेतन, आरोग्य सुविधा, विमा, भविष्य निर्वाह निधी अशा मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले आहे.या अमानुष व्यवस्थेमुळे अनेक कामगार क्षयरोग (टीबी), दमा यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त झाले. काहींनी उपचाराअभावी प्राण गमावले. त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असून अनेक घरे उध्वस्त झाली आहेत. या गंभीर प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदने देऊनही शासनाने गांभीर्याने दखल घेतलेली नाही. त्यामुळे सरकारने तात्काळ निर्णय न घेतल्यास अखिल भारतीय श्रमिक एकता युनियनच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युनियनचे अध्यक्ष मोहन पी. आर. देवेंद्र यांनी दिला आहे.मुंबईतील १९८ नगरसेवक प्रभागांमधील तब्बल ८४८ संस्थांमार्फत हे कामगार कार्यरत आहेत. प्रत्यक्षात कंत्राटी व कायम कामगारांसारखेच काम करूनही त्यांची कामगार म्हणून नोंदणी करण्यास पालिकेला नेमकी काय अडचण आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. "समान काम करणाऱ्यांना वेगवेगळा न्याय का?" असा भेदभाव करणारी ही व्यवस्था संविधानाच्या तत्त्वांनाच हरताळ फासणारी आहे. इतर युनियनचे कामगार न्यायालयात गेले आणि टप्प्याटप्प्याने कायम झाले, मग हे स्वयंसेवक अजून किती दिवस अन्याय सहन करणार, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.कोरोना काळात शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या कामगारांना रेल्वेतून विशेष पास देऊन अत्यावश्यक सेवेत सहभागी करून घेतले. त्या काळातही दुर्गंधीयुक्त व



धोकादायक कामे त्यांनी प्राणपणाने केली; मात्र त्यांच्या नावावरील 'स्वयंसेवक' हा डाग मात्र पुसला गेला नाही. आता "आम्ही कामगार नाही, स्वयंसेवक आहोत" ही वस्तुस्थिती लक्षात आल्यावर अनेकांच्या मनात प्रचंड वेदना आहेत. काही स्वयंसेवक आत्मदहन करण्याच्या तयारीत असून, अशी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पालिका व सरकारची असेल, असा इशारा मोहन पी. आर. देवेंद्र यांनी दिला आहे.दत्तक वस्ती योजना २००१ पासून सुरू असून २०१२ मध्ये तिचे नाव बदलून 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' करण्यात आले. सुरुवातीला केवळ ५० रुपयांवर काम करणाऱ्या या कामगारांचा आज २४ वर्षांनंतर पगार अवघा ५४०० रुपये आहे. प्रबोधनाच्या नावाखाली संस्थांना ६०० रुपये दिले जातात. एई व जेई यांनी केवळ आश्वासनांचे गाजर दाखवत कंत्राटदारांचे हित जपले आणि या कामगारांना नरकयातना भोगण्यास भाग पाडले, असा गंभीर आरोप युनियनकडून करण्यात आला आहे.मुंबई स्वच्छ ठेवण्यासाठी स्वतःचे आरोग्य, आयुष्य पणाला लावणाऱ्या या कामगारांना न्याय मिळणार की नाही, हा प्रश्न आज ऐरणीवर आला आहे. सरकारने वेळीच पावले उचलली नाहीत, तर या वेदनेचा उद्रेक रस्त्यावर होईल, अशी तीव्र भावना कामगार वर्गातून व्यक्त होत आहे. पालिकेचे ओएसडी सुभाष दळवी यांनी या स्वयंसेवक नावाची ही पोलिसी तयार केली. त्यावेळी त्यांच्या मनात या स्वयंसेवक नावाचा कामगार म्हणून उल्लेख झाला असता तर आज ही स्वयंसेवक कामगार म्हणून हक्काची रोजी रोटी खात असते. मात्र कंत्राटदारांच्या हाताखालचे बाहुले बनणाऱ्या या सरकारी बाबूंना माया जवळची वाटते असा संतप्त सवाल मोहन पी. आर. देवेंद्र यांनी केला.

# दर्यापुरात काँग्रेसने राखली सत्ता; मंदाकिनी भारसाकळे विजयी

**25 पैकी काँग्रेस 17 नगरसेवकः भा. ज .पा 4.शिवसेना ( शिंदे गट 2) राष्ट्रवादी (अ.प.1) (राष्ट्रवादी.श.प 1)**

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/दर्यापूर :** अत्यंत सुरशीच्या झालेल्या दर्यापूर नगरपालिका निवडणुकीचे निकाल आज लागने असून त्यात काँग्रेसने बाजी मारली आहे काँग्रेसच्या मंदाकिनी सुधाकर भारसाकळे यांनी ८९१० मते मिळवत विजयाची नोंद केली आहेत.आ. प्रकाश भारसाकळे यांनी प्रतिष्ठा पणाला लावल्यावर सुद्धा भाजप तिसऱ्या स्थानावर गेली असून शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रदीप मलिये काँग्रेसला लढत देत दुसरे स्थान राखले आहे.२५ नगरसेवक पदासाठी झालेल्या या निवडणुकीत काँग्रेस ने१७ जागा जिंकल्या असून



भाजप ने ४. शिवसेना शिंदे गट ने २ राष्ट्रवादी शरद पवार गटा ने १ तर अजित पवार गटा ने१ जागा जिंकली आहे.

दर्यापूर नगर पालिकेच्या आवारात सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात झाली सुरुवातीला टपाली मतमोजणी करण्यात आली त्यानंतर प्रभाग निहाय मतमोजणी झाली.

अध्यक्ष पदाची मोजणी शेवटी घेण्यात आली यासाठी एकूण ४५ कर्मचारी ६० पोलीस व पालिका कर्मचारी सहभागी झाले होते निवडणूक अधिकारी म्हणून प्रशासक विकास खंडारे व निवडणूक अधिकारी दादासाहेब दराडे व अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रवींद्र कुमार कानजडे यांना मार्गदर्शनात कामकाज संपन्न झाले.

सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी

वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर

प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये

डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# दिव्या' चे दिव्य महिला शक्ती प्रदर्शन; भाजप महिला संमेलन उत्साहात पार!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाची नवीन कार्यकारिणी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली.त्या अनुषंगाने नागपूर शहरात महिला मोर्चाची कार्यकारिणी बैठक व संमेलन जोमाने पार पडले. महिला मोर्चा अध्यक्ष दिव्याताई धुरडे यांच्या नेतृत्वात व नियोजनात हे संमेलन पार पडले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करत भारतीय जनता पक्षाने महिला सक्षमीकरणासाठी राबविलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा सविस्तर आढावा घेतला. महिलांनी बूथ स्तरापासून ते शहर पातळीपर्यंत संघटन अधिक मजबूत करावे,जनतेशी थेट संवाद साधावा तसेच पक्षाच्या धोरणांचा प्रभावी प्रचार करून आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहावे, असे मार्गदर्शन करण्यात आले.या यशस्वी संमेलनात संपूर्ण महानगरातून हजारावर महिला उपस्थित होत्या संपूर्ण हॉल व बाल्कनी महिलांच्या गर्दीने भरून होते.या कार्यक्रमास नागपूर शहर भाजप अध्यक्ष मा. श्री. दयाशंकरजी तिवारी, पूर्व नागपूरचे आमदार मा. श्री. कृष्णा भाऊ खोपडे, मध्य नागपूरचे आमदार मा. श्री. प्रविणजी दटके, महामंत्री मा.श्रीकांतजी आगलावे सहसंपर्क प्रमुख बाल्या बोरकर,यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमात मनिषाताई धावडे, अर्चनाताई डेहनकर,प्रगतीताई पाटील, नीताताई ठाकरे, चेतनाताई टाक, कीर्तीदा अजमेरा, अनिता काशीकर, विशाखा जोशी, मनिषा अतकरे, वंदना शर्मा, स्वातीताई आखतकर, मोहिनी रामटेके, वनिताताई कानडे आदी महिला पदाधिकारी व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या."जो पर्यंत पक्षाची उमेदवारी जाहीर होत नाही तो पर्यंत केंद्र सरकार,राज्य सरकार च्या व मनपा ची महिला कल्यान योजने द्वारा राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती घराघरांत पोहचवावी,कोविड काळात केलेल्या कार्याची पुन्हा आठवण करून द्यावी व ज्यांनी संकटाच्या काळात साथ दिला त्यांना आगामी महानगरपालिका निवडणूकीत निवडून आणावे असे जनतेला आवाहन करावे"असे आवाहन भाजपा शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी महिला संमेलनाला संबोधित करतांना केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महिला मोर्चाच्या अध्यक्ष दिव्याताई धुरडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले व महिला मोर्चा भाजपच्या संघटनात्मक ताकदीचा कणा असल्याचे नमूद करत,आगामी काळात पक्षाच्या विजयात महिलांची भूमिका अधिक निर्णायक राहील, असा विश्वास व्यक्त केला.

# गव्हाण विद्यालयात प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांचे व्याख्यान

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण -कोपर येथे सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांचे 'साहित्य जीवनात दिशादर्शक' या विषयावर इ. अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.डॉ.सुभाष वाघमारे हे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे मराठी विषयाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.त्यांना मराठी विषयाचा दांडगा अनुभव आहे आणि म्हणूनच विद्यालयातील अकरावी बारावीच्या कला शाखेतील विद्यार्थ्यांचं ज्ञानविश्व अधिक समृद्ध व्हावं व त्यांना पुढील भविष्यासाठी एक प्रेरणादायी दिशा मिळावी म्हणूनच विद्यालयात



'साहित्य जीवनात दिशादर्शक'या विषयावर वाघमारे सरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी डॉ.सुभाष वाघमारे यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत केले.

आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना डॉ.सुभाष वाघमारे यांनी जीवनातील आव्हानांना हसत हसत सामोरे कसे जावे, जीवनात सकारात्मक दृष्टिकोन बाळगून आलेल्या प्रत्येक समस्येवर उपाय शोधत, मार्गक्रमण करत यश संपादन करावं याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरित केलं.मराठी विषयाचे साहित्य हे विद्यार्थी दशेत असताना आपल्या जीवनात दिशादर्शक ठरतं आणि म्हणूनच मराठी साहित्याचा अभ्यास करून जीवनाची योग्य दिशा ठरवावी.सकारात्मक दृष्टिकोन अंगी बाळगावा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक श्री विलासराव लेंभे,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर श्री रवींद्र भोईर,लाइफ वर्कर श्री देवेंद्र म्हात्रे,ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख श्री प्रा. श्री संजय उगले,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.श्री राजेंद्र चौधरी, प्रा.सोनटक्के सर,प्रा. श्री.माणिक घरत,प्रा.सौ अर्चना पाटील आदी उपस्थित होते.

सन २०२५ -२६ हे वर्ष रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, गव्हाण विद्यालयाचे आधारस्तंभ, रायगडचे माजी खासदार, लोकनेते माननीय श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. या अनुषंगाने त्यांच्या जीवनावर अनेक साहित्यिक जीवन चरित्र लिहीत आहेत. त्यापैकीच प्रा डॉ.सुभाष वाघमारे हे देखील रामशेठ ठाकूर साहेब यांचे आत्मचरित्र लिहिणार आहेत.या आत्मचरित्रातून रामशेठ ठाकूर साहेब यांचे संपूर्ण जीवन कार्य ते उलगडणार आहेत. त्यांची ही साहित्यकृती लवकरच आपणा सर्वांच्या वाचनासाठी उपलब्ध होणार आहे. त्या दृष्टीने विद्यालयाच्या वतीने प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांना शुभेच्छा देण्यात आल्या आणि त्यांच्या या मार्गदर्शनपर व्याख्यानाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# वीरशैव कक्कया समाज डोंबिवली व उद्योजक संजय इंगळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वधू–वर मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे) :** वीर शैव कक्क्या समाज विकास मंडळ, डोंबिवली व संजय इंगळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वधू–वर मेळावा मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. समाजातील विवाहयोग्य युवक–युवतींना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमान्य टिळक महानगरपालिका सामान्य रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय (सायन, मुंबई) येथील अधिष्ठाता डॉ. प्रमोद इंगळे उपस्थित होते. यावेळी उद्योजक राजेश खंदारे, डॉ. पी. पी. पोळ, महासंघाचे अध्यक्ष निवृत्ती सावळकर, राम कोकणे, नरसिंग कावळे,



चंद्रकांत कोकणे ,श्रीकांत कटके ,शंकर इंगळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.या प्रसंगी समाजातील मुला–मुलींनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान व सत्कार करण्यात आला. या सत्कारामुळे उपस्थित युवक–युवतींना प्रोत्साहन मिळाले.मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून समाजातील तरुण पिढीने शिक्षण, संस्कार व सामाजिक एकतेकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन केले. अशा उपक्रमांमुळे समाजाची बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे उद्योजक संजय इंगळे यांनी मेळाव्यासाठी सभागृह विनामूल्य उपलब्ध करून दिले.आपल्या पाल्याचे योग्य वयात विवाह व्हावा, याकडे पालकांनी विशेष लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. कारण योग्य वेळी घेतलेला निर्णय भविष्यातील वैवाहिक आयुष्य अधिक सुसंवादी, स्थिर आणि सुखी बनवतो.विवाह ठरविताना वधू-वराकडे किती पैसा किंवा संपत्ती आहे यापेक्षा त्यांचे शिक्षण, विचारसरणी, संस्कार, कुटुंबमूल्ये आणि स्वभाव यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. हेच घटक यशस्वी आणि टिकाऊ वैवाहिक जीवनाची खरी पायाभरणी करतात. आजच्या काळात घटस्फोटाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. यामागे संवादाचा अभाव, अपेक्षांची तफावत आणि समजुतींचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे विवाहपूर्व व विवाहोत्तर वैवाहिक समुपदेशनाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. अशा समुपदेशनातून वधू-वरांना जबाबदाऱ्या, समजूतदारपणा आणि परस्पर आदर यांचे महत्त्व समजते, जे सुखी संसारासाठी अत्यंत आवश्यक आहे.असं मत मान्यवरांनी मांडले. सदर वधू–वर मेळाव्यात सुमारे सव्वाशे मुला–मुलींनी आपली नोंदणी केली आहे. या नोंदणीची माहिती संकलित करून लवकरच तिचे पुस्तक स्वरूपात रूपांतर करण्यात येणार असून, हे वधू–वर नोंदणी पुस्तक लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वीरशैव कक्क्या समाज विकास मंडळ, डोंबिवलीच्या अध्यक्ष कांता तपासे, सचिव भगवान गन्ने, खजिनदार शंकर अवसरे, उपाध्यक्ष अशोक कदम, प्रवक्ते शशिकांत सोनवणे यांच्यासह विष्णू शिंदे, अशोक पोळ, पांडुरंग केंद्रे, ऐश्वर्य कोल्हरकर, कैलास व्हटकर, अॅड. प्रमोद गांधले, अनिरुद्ध तपासे, गणेश सोनवणे, आशा सोनवणे, लता सोनवणे, प्रिया सोनवणे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित समाजबांधवांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# इलेक्ट्रिक स्कुटीला बलकरची धडक, महिलेचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** इलेक्ट्रिक स्कुटीला सिमेंट बलकरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात विद्या विठ्ठल गायकर (वय 51, राहणार डोलघर) यांचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी 22 डिसेंबर रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात बलकर क्रमांक एम एच ४६ सी यु २३०६ वरील चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता विठ्ठल बजरंग गायकर आणि त्यांची पत्नी विद्या गायकर हे ओला कंपनीची इलेक्ट्रिक स्कुटी क्रमांक एम एच ४६ सी टी ७१२२ घेऊन पनवेल तहसीलदार कार्यालय येथे गेले. दुपारी पावणे दोनच्या सुमारास पळस्पेकडून पेण कडे जाणाऱ्या गोवा हायवेने जात असताना क्षणभर विश्रांती हॉटेल समोरील पेणकडे जाणाऱ्या रस्त्यावर विरुद्ध दिशेने येऊन बलकर क्रमांक एम एच ४६ सी यु २३०६ वरील चालकाने त्यांच्या इलेक्ट्रिक स्कुटीला धडक दिली. या अपघातात विठ्ठल गायकर आणि विद्या गायकर हे जखमी झाले. विद्या गायकर यांना रुग्णवाहिकेने पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रायगड जिल्हा फुल कॉन्ट्रॅक्ट कराटे कॉम्पिटिशन मध्ये पीएनपी इंग्लिश मिडीयम स्कूल वावोशीच्या विद्यार्थ्यांची उत्तम कामगिरी



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी खालापूर/संतोष शेवाळे :** आज दिनांक 22 डिसेंबर 2025 वार रविवार ठिकाण ग.रा .मेहता माध्यमिक स्कूल चे चेअरमन मा.पवार साहेब निजामपूर येथे रायगड जिल्हा फुल कॉन्टॅक्ट कराटे कॉम्पिटिशन पार पडली या स्पर्धेमध्ये पीएनपी इंग्लिश मीडियम स्कूल च्या प्रिन्सिपल सौ.सोनाली जाधव मॅडम विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता मार्शल स्पोर्ट्स अकॅडमी या संस्थेमार्फत हे कार्ड कॉम्पिटिशन घेण्यात आली होती संस्थेचे संस्थापक सेन्साई कल्पेश शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कॉम्पिटिशन पार पाडण्यात आली सीनियर इन्स्ट्रक्टर ब्लॅक बेल्ट रिया पाटील मॅडम ब्लॅक बेल्ट करण जाधव पीएनपी स्पोर्ट्स कमिटी अध्यक्ष मनीषा पाटील

**विद्यार्थ्यांची नावे व मेडल**

1.अर्चित रूपेश जाधव-:सुवर्णपदक
2.श्लोक हरिभाऊ पाटील -:रौप्य पदक
3.अनिरुद्र परमाणिक -:कांस्य पदक
4.निहार हरिभाऊ पाटील -: कांस्य पदक
5.अश्वदीप मोरे -:कांस्य पदक
६.आदित्य शाह -:कांस्य पदक
7.दुर्वा राजेंद्र गोरे -:कांस्य पदक

# महाराष्ट्रातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजप पुन्हा नंबर १ नंबर चा पक्ष

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विकासाभिमुख राजकारण व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे संघटन कौशल्य आणि अचूक निवडणूक नियोजन यांच्या जोरावर भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक निकालात अभूतपूर्व असे यश मिळवले आहे.

महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मुखातून देवेंद्र आणि रविंद्र या जोडगोळीचा नेहेमी होणार आदरार्थी उल्लेख आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी आज सार्थ ठरवला. यंदाच्या निवडणुकीत प्रचारगीतातून गाजलेले "तुमची आमची भाजपा सर्वांची" हे बोल महाराष्ट्रातील जनतेने खरे करून दाखवले, हे या निकालावरून सिद्ध झाल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

रविंद्र चव्हाण यांनी सहा महिन्यांपूर्वी प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यानंतर अतिशय शिस्तबद्धपणे आणि संयम व आक्रमकपणाच्या अनोख्या शैलीतून महाराष्ट्र पिंजून काढला. यादरम्यान अनेक दिग्गज नेते त्यांनी भाजपात आणले. कोकणात वर्चस्व असलेल्या रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाचा खरंतर या निवडणुकांच्या निमित्ताने कस लागला, त्यात रविंद्र चव्हाण पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाल्याचे आज



स्पष्ट झाले. राज्यात अनेक ठिकाणी शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्याशी भाजपाची लढत होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्यामुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्या संघटन कौशल्यामुळे अनेक ठिकाणी लढत जिंकली.

मात्र त्याचवेळी राज्यात सत्तास्थानाला किंवा महायुतीला बाधा पोहोचणार नाही, याचं गणित देवेंद्र फडणवीस आणि रविंद्र चव्हाण यांनी एकत्रितपणे अचूक सोडवले. याबरोबरच सेनेच्या आणि राष्ट्रवादीच्या दुसऱ्या फळीला भाजपने त्यांची जागाही दाखवली असे दिसते. श्रीकांत शिंदे यांच्याशी असलेले रविंद्र चव्हाण यांचे प्रेम व तिरस्कार असे दुहेरी संबंध गेल्या काही दिवसांतील भाजपा पक्ष प्रवेशामुळे अधिक गहिरे होतील का?, अशी शक्यता आजच्या निकालांमुळे झाली आहे.

जानेवारीत होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांच्या बाबतीतही देवेंद्र-रविंद्र यांची किमया चालेल अशीच शक्यता अधिक असल्याने मात्र महायुतीतील सहकारी पक्ष आता कशी व्यूहरचना करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# नांदेड मनपा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी सज्ज; मुलाखतींना इच्छुकांचा उदंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/ प्रकाश गवारे :** आगामी नांदेड महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने (VBA) जोरदार तयारी सुरू केली असून, उमेदवार निवड प्रक्रियेच्या पहिल्याच टप्प्यात पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. आज पार पडलेल्या मुलाखतींच्या प्रक्रियेत तब्बल ७८ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने नांदेडच्या राजकीय वर्तुळात वंचित बहुजन आघाडीच्या वाढत्या ताकदीची चर्चा सुरू झाली आहे.

नांदेड महानगरपालिकेवर वंचित बहुजन आघाडीचा



झेंडा फडकवण्याच्या उद्देशाने पक्षाने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन केले होते. सकाळपासूनच या प्रक्रियेला वेग आला असून, इच्छुक उमेदवार आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक प्रभागातून सामाजिक बांधिलकी असलेले, जनसंपर्क मजबूत असलेले आणि पक्षकार्याशी दीर्घकाळ जोडलेले चेहरे मुलाखतींसाठी पुढे आले.

आजच्या प्रक्रियेत एकूण ७८ जणांनी अधिकृतपणे उमेदवारी अर्ज सादर केले. यामध्ये युवकांसह अनुभवी कार्यकर्त्यांचा लक्षणीय सहभाग दिसून आला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राज्यभर मिळालेल्या यशानंतर नांदेडमध्येही पक्षाची ताकद वाढत असल्याचे या प्रतिसादावरून स्पष्ट होत आहे.

मुलाखती दरम्यान उमेदवारांचा सामाजिक कार्याचा अनुभव, प्रभागातील जनाधार, संघटनात्मक कामगिरी आणि पक्षाप्रती निष्ठा या बाबींवर विशेष भर देण्यात आला. नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी आणि वंचित, उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी सक्षम उमेदवार निवडले जातील, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.या वेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुख अहमद, राज्य कार्यकारिणी सदस्य अविनाश भोसीकर, प्रशांत इंगोले, शिवा नरंगले व शाम कांबळे उपस्थित होते.

# रमेश मुनेश्वर व रुपेश मुनेश्वर या शिक्षक बंधूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव :** लातूर येथे संपन्न झालेल्या शिक्षक , कर्मचारी व अधिकारी विभागीय स्पर्धेत रमेश मुनेश्वर यांनी एकपात्री अभिनय व रूपेश मुनेश्वर यांनी स्वरचित काव्य सादरकीरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याने तालुक्यातील या दोन शिक्षक बंधूची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाल्याने सर्वत्र त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र , पुणे व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने दयानंद महविद्यालय , लातूर येथे शिक्षक , कर्मचारी व अधिकारी यांच्या विभागीय स्पर्धा आयोजित केल्या होत्या. तालुक्यातून प्रथम आलेल्या स्पर्धकांना यात सहभागाची संधी होती. यावेळी भूमिका अभिनय या क्षेत्रातील व्यसनाधीनतेवर मात



रमेश मुनेश्वर      रुपेश मुनेश्वर

या विषयावर तालुक्यातील शनिवारपेठ केंद्रातील दरसांगवी ( चि ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक रमेश यादवराव मुनेश्वर यांनी 'मी हरलो होतो पण जिंकलो ' ही एकपात्री नाटिका सादरकरून आणि स्वलिखित काव्य लेखन आणि सादरीकरण स्पर्धेत मोहपूर केंद्रातील लक्कडकोट जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक रुपेश माधवराव मुनेश्वर यांनी शेतकऱ्यांच्या वेदना मांडणारी ' शेतकरी बाप ' ही कविता बहारदार सादर करून विभागातून प्रथम क्रमांक पटकावला. या शिक्षक बंधूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाल्याबद्दल डायटचे प्राचार्य अमोल निळेकर जिल्हा परिषद, नांदेडच्या शिक्षणाधिकारी (प्रा) वंदना फुटाने, शिक्षणाधिकारी (मा) माधव सलगर, शिक्षणाधिकारी (यो) दिलीपकुमार बनसोडे, किनवट पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर जम्पलवाड, मनिषा बडगीरे, केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे, राम बुसमवार, पद्माकर कवटीकवार, रमेश राठोड, रमेश खूपसे, विजय मडावी, राजेश्वर जोशी, चंद्रकांत मोरे, सुरेश पाटील, शेषराव पाटील, अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचे राज्याध्यक्ष नटराज मोरे, इब्टाचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब लोणे आदी मान्यवरांसह बहुसंख्य शिक्षक बंधू-भगिनिंनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचे कन्नड तालुका कार्यकारिणी जाहीर



**छत्रपती संभाजीनगर/ सतिश लोखंडे :** औराळा फाटा ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचे कन्नड तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. या कन्नड तालुक्याच्या आमदार मा.सौ. संजनाताई जाधव व श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष आबासाहेब भोसले , संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष हरीषभाऊ गंगाबाई शिवदास राठोड , आणि करमाड येथील उद्योजक मा.आणाभाऊ महाराष्ट्र कार्याध्यक्ष मा. बाबासाहेब चव्हाण यांच्या उपस्थितीत व आदेशानुसार कन्नड तालुका कार्यकारिणी जाहीर केली. संतोष साळुंके तालुका अध्यक्ष , संकेत भारतीय तालुका कार्याध्यक्ष , काकासाहेब सपकाळ तालुका उपाध्यक्ष , प्रविण शिंदे तालुका उपाध्यक्ष , रावसाहेब काळे तालुका उपाध्यक्ष , गणेश जाधव सचिव , मिलिंद पवार संघटक , विजय निकम सहसघटक , पंढरीनाथ सोनवणे ता. समन्वयक , अनिल सोनवणे कोषाध्यक्ष , सुमित काळे सोशल मीडिया प्रमुख , भुषण निकम सदस्य , रितेश भवर सदस्य , विजय नलावडे सदस्य , संतोष बनकर सदस्य , ह्या सर्व पदाधिकार्यांच्या वरील मान्यवरांनाच्या उपस्थित निवड करण्यात आली.

# बार्टी वर्धापन दिनानिमित्त आकार कॉलेज येथे संविधान जागर कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/ नागपूर -** महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, या संस्थेच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त व संविधान जागर अभियान अंतर्गत हिंगणा तालुका समतादूत सतीश सोमकुवर यांच्या वतीने आकार ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट कॉलेज हिंगणा येथे संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उषा पिल्लेवार, कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून हृदय गोडबोले प्रकल्प अधिकारी समतादूत विभाग बार्टी, हिंगणा तालुका समतादूत सतीश सोमकुवर, तसेच आकार ग्रुप कॉलेज चे व्यवस्थापकीय अधिकारी देवानंद रेंगे, पर्यवेक्षिका पूजा राणे यांनी प्रमुख उपस्थिती म्हणून मंचावर स्थान भूषविले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक बार्टी प्रकल्प अधिकारी हृदय गोडबोले यांनी बार्टी संस्थेच्या व सामाजीक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती देवून सांगितले की, हा देश विविध जाती,धर्म व पंथांचा असुन सुद्धा संविधानाने सर्वांना एकत्रित गुंफुन ठेवलेले आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी खिस्यात अंरॉईड फोन ठेवून जमणार नाही तर डोक्याने अंरॉईड होण्याची आवश्यकता आहे. विध्यार्थ्यांना जीवनात उपयोगी पडेल असे मौलिक उदाहरणे व दाखले देत आपल्या प्रबोधन शैलीत हृदय गोडबोले यांनी मार्गदर्शन केले. तसेच समतादूत सतीश सोमकुवर यांनी भारतीय संविधानावर आपले विचार व्यक्त करतांना सांगितले की, राष्ट्रनिर्मीती साठी व राष्ट्राच्या पायाभरणी साठी भारतीय संविधानाचे महत्वपूर्ण योगदान आहे. आजचा विद्यार्थी उद्याच्या भारताचे भवितव्य आहे, त्याकरिता विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान अभ्यासले पाहिजे. संविधानातील मूल्ये समजून घेतली पाहिजे. भारतीय संविधान माणसाला माणुसकी शिकविते व राष्ट्रधर्माची व देशभक्तीची जाण करून देते. म्हणूनच भारतीय संविधानाचा जागर होणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन बार्टी समतादूत सतीश सोमकुवर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सामूहिक भारतीय संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशी खरोडे व आभार तृप्ती वाघमारे या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# अलिबाग नगरपरिषदेत 'हुनी' ठाकूरांचा दणक्यात विजय; आशिष गोंधळींच्या प्रोत्साहनाने काँग्रेसला बळ, नवचैतन्याची लहर!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग/ रेवदंडा प्रतिनिधी :** अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत 'हुनी' उर्फ समीर मधुकर ठाकूर यांचा विजय होऊन काँग्रेस पक्षाला मोठी बळकटी मिळाली! अलिबागकरांच्या मनात आणि जनसामान्यांमध्ये 'आपलाच हुनी' हे समीकरण जुळवणाऱ्या या तरुणाला जनतेचे प्रेम इतके की, समोरच्याचे डिपॉझिट जप्त करून दणक्यात निवडून दिली. रेवदंडा येथील प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते आशिष गोंधळी यांनी त्यांना



पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित करत मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. या विजयाने काँग्रेसला वाढीस नवचैतन्य मिळू शकेल!अलिबाग नगरपरिषदेत 'आपला हुनी', काँग्रेसची मजबुती .अलिबाग नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून निवडलेले समीर ठाकूर हे स्व. मधुशेठ ठाकूर यांचा साधा-सोप्पा वारसा जोपासणारे आहेत. 'माजी आमदारांचा मुलगा' हे बिरुद मिरवत नाहीत, तर रुग्णालयात मदत, सरकारी कामांसाठी धावपळ, नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागाने अलिबागकरांच्या हृदयात 'हुनी म्हणजे आपलाच माणूस' हे समीकरण जुळले. या विजयाने अलिबाग नगरपरिषदेत काँग्रेसला नवे जोर मिळाले असून, स्थानिक विकासाच्या प्रश्नांसाठी पक्ष मजबूत होईल.आशिष गोंधळींचे समर्थन, पक्षाला नवचैतन्य

आशिष गोंधळी म्हणाले, "हुनीचा विजय म्हणजे अलिबाग नगरपरिषदेत काँग्रेसला बळकटी! साधेपणाने जनतेचा विश्वास जिंकणाऱ्या या युवकामुळे पक्षाला वाढीस नवचैतन्य मिळेल."

या विजयाने युवा पिढीला प्रेरणा मिळेल आणि अलिबागच्या विकासासाठी 'हुनी' ठाकूर काँग्रेसच्या झेंड्याखाली नव्या उमेदीने पुढे मार्गदर्शित करतील!

# अशोक शिंदे यांना 'गंगाई बाबाजी आदर्श पत्रकार पुरस्कार' जाहीर

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे भगवान कला, वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय आष्टी जि. बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या गंगाई-बाबाजी कला रौप्य महोत्सव २०२५-२६ अंतर्गत देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श पत्रकार पुरस्कारासाठी पत्रकार अशोक शिंदे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे.



व्हॉइस ऑफ मीडिया शिरूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि 'दैनिक कार्यारंभ'चे शिरूर तालुका प्रतिनिधी अशोक शिंदे यांना यंदाचा मानाचा 'गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या दीड दशकांच्या प्रदीर्घ आणि निष्पक्ष पत्रकारितेची दखल घेऊन हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. अशोक शिंदे यांनी सन २०११ मध्ये पत्रकारितेच्या क्षेत्रात पदार्पण केले. आपल्या लेखणीच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. गेल्या ९ वर्षांपासून म्हणजेच कार्यारंभ स्थापन झाल्यापासून ते आजतागायत ते 'दैनिक कार्यारंभ'चे शिरूर तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.सध्या ते व्हॉइस ऑफ मीडिया शिरूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत.ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडणारा एक अभ्यासू पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. हा पुरस्कार लवकरच होणाऱ्या गंगाई-बाबाजी कला रौप्य महोत्सव सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# हे धाडस फक्त अदिवासी च करू शकतात

**दैनिक युवक आधार**

**विजय खुडे (नरवाडीकर) :** कळमनुरी तालुक्यातील इसापूर धरण परिसरातील ढोलक्याचीवाडी येथे धरणापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर ऊसाच्या शेतात मगर आढळून आली. अचानक शेतात मगर दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक आदिवासी बांधवांनी धैर्य दाखवत त्या मगरीला सुरक्षितरीत्या पकडले. त्यांनी कोणतीही इजा न करता वन्यजीव संरक्षणाची जाणीव ठेवून मगरीला वन विभागाच्या ताब्यात दिले. वन विभागाने तातडीने मगरीला सुरक्षित ठिकाणी हलवून तिची काळजी घेण्याची व्यवस्था केली आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये वन्यजीवांविषयी जागरूकता वाढली असून



आदिवासी बांधवांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.इसापूर धरण परिसरात ढोलक्याचीवाडी येथे शेतात आज मगर आढळून आली इतिहासात पहिल्यां दाच इतकी मोठी मगर आडळल्याने सर्व शेतकरी चिंतेत पडले असून वन विभाग येण्या अगोदर स्थानिक आदीवासी युवकांने ती मगर हिंमतीने पकडली त्या नंतर वन विभाग यांचे ताब्यात डिली हिंगोली जिल्ह्यातील या मध्ये मगर पकडन्या मध्ये दत्ता काशीराम पाचपुते टाकळी (का)सरपंच. गणपत माधवराव पाचपुते. शामराव ठाकरे. विठ्ठल बाट. परबती ढाकरे. गजानन शेषराव पाचपुते भगवान विक्रम पाचपुते व इतर गावकरी मंडळी यांनी सहकार्य केले

# ग्रामसुरक्षा दलाचा पाच तास थरारक पाठलाग ;शिरवाडे वाकदमध्ये चोरट्यांची पळापळ

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** शिरवाडे वाकद परिसरात वाढलेल्या भुरट्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी लासलगाव पोलिस ठाणे प्रभारी भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आलेल्या ग्रामसुरक्षा दलाने अवघ्या काही दिवसांतच आपली परिणामकारकता सिद्ध केली आहे. सोमवार (दि.२२) रात्री तब्बल पाच तास चाललेल्या थरारक पाठलागामुळे चोरट्यांना गावातून पळ काढावा लागला. रात्री दीड वाजण्याच्या सुमारास रशीद शेख यांच्या घराजवळील गोठ्याचा दरवाजा तोडत असताना चोरट्यांचा डाव घरातील महिलेच्या आरडाओरडीमुळे उधळला. परिस्थिती चिघळताच चोरट्यांनी बद्रीनाथ आवारे यांच्या घराकडे



मोर्चा वळवला. तेथे कुत्र्यांना शांत करण्यासाठी मांस टाकण्यात आले; मात्र घरातील महिलेने खिडकी उघडताच चोरट्यांनी तेथूनही पळ काढला. यानंतर राज्यमार्ग ७ वरील शिरवाडे फाटा परिसरात संशयास्पद हालचाली दिसून आल्या. ग्रामसुरक्षा दलाच्या जवानांनी सतर्क होऊन तात्काळ परिसरात शोधमोहीम सुरू केली. अंधारात एक चोरटा दिसून आला; मात्र अंधाराचा फायदा घेत तो पसार झाला. या दरम्यान लासलगाव पोलिस पथकही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. शोधमोहीमेदरम्यान विनानंबरची मोटारसायकल आढळून आली असून, त्यावरून चोरट्यांचा अंदाज बांधण्यात पोलिसांना यश आले आहे. संपूर्ण घटनाक्रमात स.पो.नि. भास्करराव शिंदे हे पाच तास ग्रामसुरक्षा दलाच्या सतत संपर्कात होते. गावात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा चोरट्यांचा प्रयत्न मात्र ग्रामसुरक्षा दल व ग्रामस्थांच्या जागरूकतेमुळे हाणून पाडण्यात आला. यापूर्वीही रविवारी रात्री ग्रामसुरक्षा दलाने पहाटे दोनच्या सुमारास संशयास्पद वाहनाचा पाठलाग करून ते शिरवाडे फाट्याजवळ पकडले होते. सदर वाहन पोलिस हवालदार डी.डी. जाधव, राहुल घोलप, औदुंबर मुरडनर, संदीप शिंदे यांच्या ताब्यात देण्यात आले होते.

गावागावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी लासलगाव पोलिसांनी उचललेले ग्रामसुरक्षा दलाचे पाऊल आदर्श ठरत आहे. पहिल्या टप्प्यात शिरवाडे वाकद येथे दलाची स्थापना करण्यात आली असून सदस्यांना काठ्या व शिट्ट्या देण्यात आल्या आहेत. रात्री गस्त, संशयास्पद हालचालींवर लक्ष आणि तात्काळ पोलिस संपर्काच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

> **ग्रामसुरक्षा दलामुळे गावाच्या सुरक्षेची जबाबदारी सामूहिक पातळीवर घेतली जात आहे. नागरिकांची जागरूकता आणि युवकांच्या रात्रगस्तींमुळे गुन्हेगारांना गावात थांबणे कठीण झाले आहे. ही पद्धत इतर गावांसाठीही मार्गदर्शक ठरेल**
>
> **- भास्करराव शिंदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक, लासलगाव**

# गावोगावची मैदाने सिडकोने गिळंकृत केली : महेंद्रशेठ घरत

## द्रोणागिरी स्पोर्टसच्या रौप्यमहोत्सवी युवा महोत्सवाचे दिमाखात उदघाटन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** पनवेल, उरण, नवी मुंबईतील अनेक गावांना शहरीकरणाचा फटका बसला आहे. पूर्वी येथील भूमिपुत्र आपल्या गावाशेजारी मस्तपैकी माळरानावर, मैदानावर खेळायचा, प्रत्येक गावाला गुरचरण होती. मात्र सिडकोने गावोगावची मैदाने गिळंकृत केली. त्यामुळे आज गावातील तरुणांना खेळण्यासाठी मैदानेच नाहीत. शहरीकरणाच्या नावाखाली सिडकोने भूमिपुत्रांची प्रचंड फसवणूक केली आहे. सुखासुखी खेळणाऱ्या गावोगावच्या तरुणांना आपल्याला हक्काचे मैदान मिळावे, म्हणून लढावे लागत आहे. ही शरमेची बाब आहे. द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशन गेली



२५ वर्षे युवा महोत्सव भरवीत आहे. हे वाटतेय तितके सोपे काम नाही, त्यामुळे संस्थापक अध्यक्ष महादेव घरत यांना मी सॅल्यूट करतो, ते माझे जुने सहकारी आहेत. द्रोणागिरी स्पोर्टस ही भूमिपुत्रांची संस्था क्रीडा पटूंच्या विकासासाठी गेली २५ वर्षे धडपडत आहे; परंतु त्यांना आजही मैदान मिळू शकले नाही, याची खंत वाटते. आजपर्यंत या व्यासपीठावर अनेक मंत्री आले, पण मैदान मिळाले नाही. कर्नाळा स्पोर्टस, रामशेठ ठाकूर स्पोर्टस कॉम्प्लेक्स यांच्या उभारणीत माझा सिंहाचा वाटा आहे. अलीकडे सिडकोने हजारो एकर जमीन सेझच्या नावाखाली धनदांडग्यांच्या घशात घातली, मात्र भूमिपुत्रांना मैदानांसाठी रस्त्यावर यावे लागतेय, ही सरकारची वृत्ती निषेधार्ह आहे. त्यामुळे येत्या काळात भूमिपुत्रांनो, एकजूट करून पाठपुरावा करू या आणि हक्काने मैदाने मिळवू या. मी माझ्या परीने लढतोय, त्यामुळेच शेलघर, मोरावे, गव्हाण यांसारख्या आठ-दहा गावांना मैदाने मिळवून दिली आहेत. द्रोणागिरी स्पोर्टसची आजपर्यंतची कामगिरी उत्तम आहे. त्यामुळे अनेक खेळाडू घडले आहेत, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत बोकडविरा-चारफाटा येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशनच्या युवा महोत्सवाचे उदघाटन झाले. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर उपस्थित होते.

यावेळी मनोहर भोईर म्हणाले, द्रोणागिरी स्पोर्टसला मैदान मिळालेच पाहिजे. प्रसंगी त्यासाठी सिडकोला दणका द्यावा लागेल. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, शासकीय, सांस्कृतिक, कला क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्यांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी संचलन, लेझीम पथकाद्वारे मान्यवरांची मने जिंकली.

# राष्ट्रीय महामार्गावर वाई बाजार येथे अपघात

## मोटरसायकलची ट्रकला मागून धडक दोन जागेवर ठार एक गंभीर

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर/प्रतिनिधी सय्यद इसा :** माहूर तालुक्यातुन गेलेल्या धनोडा ते कोठारी राष्ट्रीय महामार्गावरील वाई बाजार जवळील वाघाइ टेकडी जवळ असलेल्या रस्त्यावर उभ्या ट्रकला मोटरसायकलची मागून जोरदार धडक बसल्याने मोटरसायकल वरील तिघांपैकी दोन जण जागेवरच ठार झाले तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना दि 23 रोजी 4 वाजता घडली आहे



वाघाई टेकडी जवळ रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या बीकेसी कंपनीच्या ट्रक क्रमांक AP39,ux,6876 मोटर सायकल क्रमांक.m h 26,f 4238 ची जोरदार धडक बसली मोटरसायकल वर बसलेले असोली साईनगर येथील तरुण विठ्ठल राठोड वय ३० वर्ष आणि अर्जुन विठ्ठल राठोड वय 10 वर्ष सोबत एक आंध्रप्रदेशातील वयोवृद्ध अंदाजे ६५ वर्ष हे तिघे आसोली ते लसनवाडी येथे जात असताना वाघाई टेकडी जवळअचानकपणे मोटरसायकल ट्रकवर मागून जाऊन आदळली झालेल्या धडकेत दोघांच्या डोक्यात तोंडाला छातीला मार लागल्याने दोघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला तर दहा वर्षीय अर्जुन गंभीर जखमी झाला

घटना कळताच सिंदखेडचे सपोनी रमेश जाधवर यांनी घटनास्थळी धाव घेऊन मयता सह जखमींना माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले येथे डॉ मंगेश नागरगोजे यांनी दोघांचा मृत्यू झाल्याचे घोषित करून जखमी अर्जुन वर उपचार सुरू आहेत अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जि. प. उच्च प्राथमिक शाळा, कुर्लीच्या विद्यार्थ्यांचा विभागीय क्रीडा स्पर्धेत दणदणीत विजय




**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी :** कुर्ली ता. घाटंजी विभागीय स्तरावर पार पडलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये जि. प. उच्च प्राथमिक शाळा, कुर्ली (ता. घाटंजी) येथील विद्यार्थ्यांनी विशिष्ट कामगिरी करत दणदणीत विजय संपादन केला असून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

प्रक्रम क व प्रक्रम ब प्रकारातील वैयक्तिक तसेच सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली क्रीडाक्षमता सिद्ध केली.या घवघवीत यशामागे शाळेतील शिक्षकवृंद, व्यवस्थापन व स्थानिक नेतृत्व यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. या यशाचे श्रेय मार्गदर्शक उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री विलास किरणापुरे सर, पदवीधर शिक्षक श्री शंकर केमेकार सर, पदवीधर शिक्षिका कु. सुप्रिया पडगीलवार मॅडम, क्रीडा शिक्षक श्री भारत उरकुडे सर व श्री सुनील ठाकरे सर, तसेच शिक्षक श्री महेश कनाके सर, श्री काशिनाथ कुलसंगे सर, दिलीप सर, जाधव मॅडम व दुर्गा मॅडम यांच्या प्रेरणा, मेहनत व योग्य मार्गदर्शनास जाते.

याशिवाय शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री आकाश भाऊ आत्राम व गावाचे सरपंच श्री सतीश गड्डमवार यांनीही विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रोत्साहन देत मोलाचे सहकार्य केले.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी सर्व स्तरातून हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# शेतात काम करणाऱ्या महिलेवर बिबट्याचा हल्ला

### महिलेचे मुंडके जबड्यात पकडल्याने झाल्या गंभीर जखमी

### नरभक्षी झालेल्या बिबट्याला तात्काळ जेर बंद करा शेतकर्यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील मौजे बामनगुडा येथील शेतात काम करणाऱ्या महिलेवर बिबट्याने हल्ला करून महिलेचे तोंडच जबड्यात धरून चावल्याने महिला गंभीर जखमी झाली असून तिला सिंदखेड येथे प्राथमिक उपचार करून माहूर ग्रामीण रुग्णालयामार्फत पुढील उपचारासाठी यवतमाळला हलविण्याची घटना दि 23 रोजी दुपारी 2 वाजता घडल्याने शेतकऱ्यासह नागरिकात प्रचंड दहशत निर्माण झाली असून नरभक्षी बिबट्याला तात्काळ जेर बंद करण्याची मागणी होत आहे




माहूर तालुक्यात अनेक बिबटे मुला बाळा सहित धुमाकूळ घालत असून अनेक वर्षापासून बिबट्याने नागरिकावर हल्ला केला नव्हता परंतु आज बामनगुडा येथील शेतात काम करणारी महिला लता सुरेश तोडसाम वय 35 ही आपल्या पतीसह मुलगा आणि एका शेतशेजाऱ्या सोबत कापूस वेचण्याचे काम करत होती तितक्यात काही काम निघाल्याने पती सुरेश तोडसाम हे घरी गेले तितक्यातच शेताला लागून असलेल्या जंगलातून बिबट्याने त्यांच्यावर अचानकपणे झडप घालून जबड्यात महिलेचे मुंडकेच पकडून कडाडून चावा घेतल्याने महिलेला गालावर गंभीर जखम आली तर कपाळावर तसेच मानेवरही मोठ्या प्रमाणात त्याचे दात खोल रुतल्याने जीवघेण्या जखमा झाल्या घटना पाहून मुलाने आणि शेजाऱ्याने जोरात आरडा ओरड केल्याने महिलेला सोडून बिबट्याने जंगलात पळ काढला त्यामुळे महिलेचा जीव वाचला मुलाने घटना पतीला कळविल्याने त्यांनी लगेच शेतात धाव घेत महिलेला घरी आणून सिंदखेडच्या प्रथमिक आरोग्य केंद्रात नेले असतात येथे डॉ बी एम मोरे यांनी प्रथमोपचार करून माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवले येथे डॉ मंगेश नागरगोजे ब्रदर निलेश भिलावेकर कक्षसेवक तुळशीदास शेंडे सुरक्षारक्षक आकाश मुंडे यांनी उपचार करून यवतमाळ येथे 108 द्वारे डॉ सत्यम गायकवाड चालक सिद्धार्थ भालेराव यांचे निगराणीत यवतमाळला पाठवले महिलेवर हल्ला करून बिबट्या नरभक्षी झाल्याने त्याला तात्काळ जेर बंद करावे अशी मागणी नागरिकांतून होत असून वन विभागाने तात्काळ पावले उचलावीत अन्यथा नागरिकाचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही .

# अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल येथे विज्ञान प्रदर्शन,विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** सोयगाव येथील अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल येथे सोमवारी( ता.२२) विज्ञान प्रदर्शन आणि स्टुडंट्स लेड कॉन्फरन्स घेण्यात आले.येथील विज्ञान प्रदर्शनात क्षितिजा शिंदे या विद्यार्थिनी कडून प्रयोगाची माहिती घेतांना परीक्षक डॉ प्रा सुशील जावळे,डॉ. दिनकर पिंगाळकर अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सुशील जावळे आणि प्रमुख पाहुणे डॉ.रघुनाथ फुसे,संजय शाहपुरकर,संजय पाटील (ग.शि.कार्यालय) सुनील



शेटे,भास्कर पिंगाळकरसर,डॉ. दिनकर पिंगाळकर,डॉ.स्वाती पिंगाळकर,मुख्याध्यापिका मिनाक्षी रोकडे होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेच्या संचालिका डॉ.स्वाती पिंगाळकर यांनी केले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सोनाली बागुल आणि आभार प्रदर्शन पूजा दामोधर मॅडम यांनी केले. शाळेत अश्या प्रकारचे कार्यक्रम घेतल्या मुळे विद्यार्थ्याचा बौद्धिक विकास होतो,त्याला पुस्तक व्यतिरिक्त ज्ञान प्राप्त होते,त्याची अभ्यास बद्दल रूची वाढते,जिज्ञासू वृत्ती वाढते आणि ह्याच्या मुळे विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढतो असे शाळेतील संचालिका डॉ.स्वाती पिंगाळकर यांनी प्रास्ताविक करतांना सांगीतले.अध्यक्ष प्रा.डॉ.सुशील जावळे यांनी विद्यार्थ्याला विज्ञानाचे आता पर्यंत जे पण काही शोध लागेल आहेत त्याचे चांगले आणि वाईट परिणाम दोघंही बद्दल सविस्तर महिती दिली.कार्यक्रमामध्ये शाळेतील नर्सरी ते ७ वी वर्गा पासुन सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. कार्यक्रमा मध्ये विद्यार्थ्यांनी चांद्रयान,बुलडोझर,भूकंप सूचक यंत्र,ए टी एम मशीन,रेन वॉटर हार्वेस्टिंग मॉडेल,वॉटर प्युरिफायर असे विविध मॉडेल बनवले असे १०० विविध प्रकारचे प्रयोग दाखवून विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुणे तसेच पालकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका प्रियांका रोकडे, सीमा भामरे, सोनालीबागुल, दीक्षा पवार,पूजा दामोधर,रुपाली गोल्हरे,शीतल कटोले, शिक्षक रामचंद्र लाडकर यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालकांची होती.

## हॉटेल अजिंठा पॅलेस' लॉजिंग व फॅमिली रेस्टॉरंटचे २५ डिसेंबरला दिमाखदार उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यातील फर्दापूर येथील जागतिक कीर्तीच्या अजिंठा लेणींच्या सान्निध्यात असलेल्या फर्दापूर येथे प्रवासी,पर्यटक व स्थानिक नागरिकांसाठी एक नवे आकर्षण ठरणाऱ्या 'हॉटेल अजिंठा पॅलेस' लॉजिंग व फॅमिली रेस्टॉरंटचे भव्य व दिमाखदार उद्घाटन बुधवार दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता फर्दापुर–तोंडापूर रोड येथे संपन्न होणार आहे.

देश–विदेशातून अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मोठी वर्दळ लक्षात घेऊन,सुसज्ज लॉजिंग सुविधा, प्रशस्त व स्वच्छ खोल्या, उत्कृष्ट भोजन व्यवस्था तसेच कुटुंबासाठी स्वतंत्र व सुरक्षित वातावरण या हॉटेलमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या फरदापुर परिसरात 'हॉटेल अजिंठा पॅलेस' हे आतिथ्यसेवेचे नवे



दालन उघडणारे ठरणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख अतिथी,विविध क्षेत्रातील मान्यवर,व्यापारी,मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून हा कार्यक्रम परिसरासाठी एक आनंदोत्सव ठरणार आहे. पर्यटन,रोजगार व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या या उपक्रमाच्या उद्घाटनासाठी नागरिकांनी व पर्यटकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन विनीत हॉटेल अजिंठा पॅलेस चे मालक मजित शेठ यांनी केले आहे.

# शेळगाव मध्ये पतीने केला पत्नीचा खून, वालचंदनगर पोलिसांची दमदार कामगिरी

### काही तासातच आरोपीला जेजुरी येथून केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** शेळगाव(ता.इंदापूर) येथील गावठाणातील मनीषा मल्हारी खोमणे वय 35 या महिलेचा मंगळवार (दि 23) रोजी पहाटे साडेपाच ते सहाच्या सुमारास पती मल्हारी उर्फ बापू खोमणे यांनी डोक्यात लाकडाने जबर प्रहार करून खून करण्यात आला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मंगळवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी मयत महिला अंघोळीसाठी जात



असताना आरोपी पती मल्हारी उर्फ बापू रोहिदास खोमणे या नामक व्यक्तीने पाठीमागून तिच्या डोक्यामध्ये जोराचा प्रहार केल्याने ती जागीच मृत्यूमुखी पडली. तसेच ती रक्ताच्या थारोळ्यात पडली असता, पती मल्हारी उर्फ बापू खोमणे हा तिथून पळून गेला आहे. इंदापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पत्नी मनिषा खोमणे हिस दाखल करण्यात आलेले आहे.आरोपी मल्हारी उर्फ बापू खोमणे याच्या वरती वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डुणगे,सहायक पोलीस उपनिरीक्षक रतीलाल चौधर,पोलीस हवालदार दादासाहेब डोईफोडे, पोलीस कर्मचारी गुलाबराव पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून घटनेचा पंचनामा केला. आरोपी पती मल्हारी उर्फ बापू खोमणे याला शोधण्यासाठी वालचंदनगर पोलिसांची पथके तातडीने माळेगाव,जेजुरी नातेपुते सह अन्य दिशेने मार्गस्थ झाली असता.फरार आरोपी पतीला वालचंदनगर पोलिसांनी काही तासातच जेजुरी येथून केले जेरबंद.. अद्याप पर्यंत मारण्याचे कारण समजले नाही.तसेच पुढील तपास चालू आहे.

## कोष्टी समाजाच्या सौ .मनस्वी मिथुन ठाणेकर कणकवली नगरपंचायत निवडणुकीत विजयी, जनजागृती सेवा संस्थेकडून सत्कार

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** कणकवली- लोकशाहीचा आदर करुन कणकवली नगरपंचायत प्रभाग क्रमांक१२च्या विकासासाठी तेथील मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेऊन सौ.मनस्वी मिथुन ठाणेकर यांना नगरसेविका म्हणून विराजमान केले आहे. त्याअनुषंगाने आमच्या कोष्टी समाजाच्या विजयी उमेदवार सौ.मनस्वी मिथुन ठाणेकर यांना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले.त्यांच्या



निवासस्थानी जाऊन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र प्रदान करुन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गंधाली तिरपणकर, मनस्वी ठाणेकर यांचे पती श्री.मिथुन नंदकुमार ठाणेकर हे उपस्थित होते.

सौ.मनस्वी मिथुन ठाणेकर या इचलकरंजीच्या माहेरवाशीण आहेत. त्यांना निवडणुकीत विजयी करण्यासाठी पती मिथुन ठाणेकर व भाजप पदाधिकारी व सहकार्यांनी विशेष मेहनत घेतली.मनस्वी ठाणेकर या उच्च शिक्षित आहेत, इंग्रजी, मराठीवर प्रभुत्व आहे. त्या सर्वांना सोबत घेऊन कणकवली नगरपंचायत मध्ये आपल्या कामाचा,कार्याचा ठसा उमटवतील.

त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस जनजागृती सेवा संस्थेकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

## महेंद्रशेठ घरत रमले जहांगीरच्या कलादालनात ; छायाचित्रकारांचे केले कौतुक

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहरता :** उरण नगरपालिकेच्या दिमाखदार विजयानंतर कार्यकर्त्यांनी उधळलेल्या गुलालाचा रविवारी (ता. २१) दुपारी महेंद्रशेठ घरत यांनी आनंद घेतला, तर सायंकाळी चक्क 'लेकर हम दिवाने दिल' या ऑकेस्ट्राचा. मात्र उरण नगरपालिकेच्या विजयाने हुरळून न जाता सोमवारी (ता. २२) महेंद्रशेठ घरत चक्क मुंबईतील सुप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीच्या कलादालनात रमले. तेथे विविध छायाचित्रकारांची फोटोग्राफी पाहून ते हरखून गेले. मुळात त्यांना स्वतःला फोटोग्राफीची खूप आवड आहे. त्यामुळे त्यांनी जहांगीर



आर्ट गॅलरीतील प्रत्येक चित्र पाहून छायाचित्रकारांच्या कलेला दाद दिली. बहुसंख्य छायाचित्रे निसर्गाचा अद्भुत चमत्कार दाखवत होती, अनेक चित्रांत नैसर्गिक जिवंतपणा होता, त्यामुळे प्रत्येक छायाचित्रातील बारकावे न्याहाळून छायाचित्रकारांशी संवाद साधला आणि आवडणारे छायाचित्र आणि फोटो आल्बम त्यांनी चक्क खरेदी करून खऱ्या अर्थाने छायाचित्रकारांना मनमुराद दाद दिली. छायाचित्रकारांचे अभिनंदन केले.

# घरकुल लाभार्थ्यांचा संयमाचा बांध फुटला

### प्रधानमंत्री आवास योजना केवळ कागदावरच का? ; शेवटच्या हप्त्यासाठी ३१ डिसेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशेमहागाव(यवतमाळ) :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलाचे पूर्ण बांधकाम करूनही शेवटचा ४० हजार रुपयांचा हप्ता न मिळाल्याने महागाव नगरपंचायत हद्दीतील घरकुल लाभार्थ्यांचा संयम संपला आहे. गेली सात वर्षे प्रशासनाचे उंबरठे झिजवूनही न्याय न मिळाल्याने अखेर लाभार्थ्यांनी ३१ डिसेंबर २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. प्रा. शरदचंद्र डोंगरे आणि प्रकाश यादवराव नरवाडे यांच्यासह अनेक लाभार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात गंभीर आरोप करताना सांगितले की, घरकुल उभारण्यासाठी सोने-नाणे, शेतजमीन गहाण ठेवावी लागली, शेळ्या-मेंढ्या विकाव्या लागल्या, तरीही शासनाचा अधिकृत हप्ता अद्याप मिळालेला नाही.

नगरपंचायत महागांवने २०१८ व २०२५ मध्ये पत्रव्यवहार करूनही प्रत्यक्षात लाभार्थ्यांना एक रुपयाही देण्यात आलेला नाही. लाभार्थ्यांनी लोकशाही दिनाच्या तीन अर्जांद्वारे, तसेच अमरावती आयुक्त कार्यालयाकडे तक्रार करूनही नगरपंचायत, सहाय्यक आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाने एकही ठोस उत्तर दिले



नाही, असा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

घरकुल पूर्ण झाले, तपासण्या झाल्या, कागदपत्रे सादर झाली, तरी हप्ता अडवला जातोय. हे सरळसरळ गरीब लाभार्थ्यांवर अन्याय आहे,

अशी संतप्त प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी व्यक्त केली.

प्रा. शरदचंद्र डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व लाभार्थी ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय महागांवसमोर आमरण उपोषणास बसणार असून,या आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास नगरपंचायत महागांव जबाबदार राहील, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे प्रधानमंत्री आवास योजना केवळ कागदावरच का? असा सवाल उपस्थित होत असून, जिल्हा प्रशासन आता तरी जागे होणार की गरीब लाभार्थ्यांना उपोषणाच्या मार्गावरच ढकलणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अंबरनाथमध्ये बंधबिगार कामगारांची सुटका

## नाल्सा (National Legal Services Authority) योजनेंतर्गत ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाने केली धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** एकविसाव्या शतकातही बंधबिगार पद्धती अस्तित्वात असल्याचे धक्कादायक वास्तव अंबरनाथमध्ये उघडकीस आले असून, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वात नाल्सा (National Legal Services Authority) योजनेंतर्गत ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाने केलेल्या कारवाईत मे.शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनी, अंबरनाथ पश्चिम या कंपनीत असलेल्या दहा परप्रांतियांची बंधबिगाराच्या विळख्यातून सुखरूप सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाच्या सदस्या ॲड. तृप्ती पाटील यांनी दिली.

१७डिसेंबर रोजी कमलेश फुन्नन बनवासी, रा. उत्तर प्रदेश या बंधबिगार कामगाराने स्वतःची सुटका करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधल्यानंतर उघडकीस आली. संबंधित कामगाराने आपली व्यथा मांडल्यानंतर, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्पेशल सेलमार्फत तातडीने अर्ज तयार करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायमूर्ती रवींद्र पाजणकर यांच्याकडे सादर करण्यात आला. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून श्री. पाजणकर यांनी त्वरित जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे अधिकृत पत्र दिले.

नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणूकीचे अत्यंत व्यस्त कार्यक्रम असूनही जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी या प्रकरणाची तातडीने गंभीर दखल घेत संबंधित सर्व विभागांना तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या तत्परतेमुळे महसूल,पोलीस व कामगार विभाग यांचा समन्वय साधत तातडीची कारवाई सुरू करण्यात आली.



उत्तर प्रदेशातील भदोही, जौनपूर आदी जिल्ह्यांतून १)सिंटु विनोद बनवासी, वय १८वर्षे,२)चंदू हरि बनवासी, वय४०वर्षे,३) संजय डाक्टर बनवासी, वय२२वर्षे,४) कल्लू बनवासी,५)सुरज बनवासी,६) संजय खिल्लारी बनवासी, वय१९वर्षे,७)सुरेश बनवासी, ८)सुकुड विजई,९)सुखी पन्ना, १०)विजय कुमार श्रीराम,वय ३४वर्षे यांना ठेकेदार निक्की उर्फ कृष्णा कुमार अग्रहारी व नितिन तिवारी याने चांगल्या कंपनीत १८ते २०हजाराची नोकरी तसेच राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करुन देतो असे आमिष दाखवून अंबरनाथ पश्चिम येथील मे.शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनीत नोकरीला लावले. मात्र प्रत्यक्षात त्यांना अत्यंत जड कामे, उपाशीपोटी काम, अपुरी व निकृष्ट जेवण व्यवस्था, मारहाण व वेतन न देणे अशा अमानुष परिस्थितीला सामोरे जावे लागले. या कामगारांना एका लहान खोलीत कोंबून ठेवण्यात येत असे. रात्री त्या खोलीला बाहेरून कुलूप लावले जाई आणि सकाळी पुन्हा कामावर नेले जाई. मोबाईल फोन जप्त करून त्यांचा नातेवाईकांशी संपर्क तोडण्यात आला होता. हा प्रकार संगनमताने व नियोजनपूर्वक करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या निर्देशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली अंबरनाथचे तहसिलदार श्री.अमित पुरी, सर्कल अधिकारी श्री.सागवे, कामगार विभागाचे उपायुक्त संभाजी व्हनाळकर यांच्या सूचनेनुसार सहाय्यक कामगार आयुक्त अनघा क्षीरसागर यांच्या प्रतिनिधी रजनी भोर व त्यांचे इतर सहकारी,तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सैय्यद यांच्या नेतृत्वाखाली पथक तैनात करण्यात आले. निवडणूक कामात व्यस्त असतानाही सर्व अधिकाऱ्यांनी उल्लेखनीय सहकार्य केले. ही संयुक्त कारवाई रात्री उशिरापर्यंत चालली आणि पहाटे पाच वाजता अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १०बंधबिगार कामगारांची सुटका करण्यात आली असून, दोन ठेकेदारांना अटकही करण्यात आली आहे.

आरोपींवर बंधबिगार उच्चाटन अधिनियम, तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत मानवी तस्करीची कलमे लावण्यात आली आहेत. सुटका करण्यात आलेल्या कामगारांना बंधबिगार प्रमाणपत्र देण्यात आले असून, सर्वच्या सर्व दहाही बंधबिगार कामगार उत्तर प्रदेश येथील त्यांच्या मूळ गावी सुखरूप पोहोचले आहेत.

या प्रकरणातून आजही समाजात बंधबिगार व असंघटित कामगारांचे शोषण सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा घटना कुठेही आढळल्यास गप्प न बसता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातील स्पेशल सेल फॉर अनऑर्गनाइज्ड सेक्टर वर्कर्सशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाव्दारे करण्यात आले आहे.

# पालखेडला राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल येथे राष्ट्रीय शेतकरी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शेतकरी दिनाचे महत्त्व सांगून करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे कष्ट, तसेच शेतीचे देशाच्या विकासातील योगदान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शेतकरी हा देशाचा कणा असून त्याच्या अथक परिश्रमातूनच समाजाला अन्नधान्य मिळते असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. पाऊस, दुष्काळ, निसर्गाच्या लहरी व आर्थिक अडचणींना तोंड देत शेतकरी सतत परिश्रम करत असतो, याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आदरभाव निर्माण व्हावा, तसेच भावी पिढीने शेतकऱ्यांच्या समस्यांकडे संवेदनशील दृष्टीने पाहावे, हा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. शेतकरी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कृषीकन्या मोक्षदा चव्हाण, अदिती दरेकर, कावेरी बरबडे, चंचल बोऱ्हाडे, समृद्धी भांबेरे, दिपाली बहिरम, रुद्राक्षी चव्हाण यांनी परिश्रम घेतले. यावेळी मुख्याध्यापक अशोक शेळके,हेमंत होलगडे,संजय लव्हंगडे,मंगेश कागदे,राहुल दवते,राजेंद्र नाठे, संदीप आहेर,वैशाली मोते,सारिका पवळे यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुलढाणा जिल्हा पत्रकार श्री सिद्धार्थ धंदरे यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**रंगनाथ सावळे पाटील/ तालुका प्रतिनिधी चिखली :** बी एस एफ बहुद्देशीय संस्था, सत कबीर बहुद्देशीय संस्था, संकल्प बहुद्देशीय संस्था व उपेक्षित नायक न्यूज यांच्या वतीने कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन साई गजानन मंगल कार्यालय, शेगाव जिल्हा-बुलढाणा येथे करण्यात आले होते.कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भूषण सरदार व आर्यमेघ सरदार हे होते.

साहित्य क्षेत्रातील दखल घेत कु. अश्विनी बाळकृष्ण सांगळे यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये सन्मानित करण्यात आले.अमोल अंबादास जाधव( सोशल वेलफेयर फॉउंडेशन नाशिक) हे कार्यक्रम अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तरविशेष उपस्थिती मध्ये मोनालिसा गोविंद वर्मा (समाजसेविका), मॉडेल ऋतुजा लुटडे,वरिष्ठ कोषागार अधिकारी शिल्पा पवार,लोकमत पत्रकार विष्णू गायकवाड,डॉ. शशिकांत मुळे,दिग्दर्शक निर्माता-डी एन इंगळे,सतीश नारायण शिंदे (साहित्यिक),रितिका साळुंखे (प्रसिद्ध मॉडेल),संध्या



पहूरकर ( प्रसिद्ध रिल्स स्टार) हे सर्व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुद्धा कु. अश्विनी सांगळे यांनी केले. आयोजन समिती मधील- कु अश्विनी सांगळे,सौ वैशाली सोनवणे, राजनंदिनी अहिरे, पत्रकार रामभाऊ आवारे, पत्रकार डॉ. शाम जाधव, पत्रकार मुकुंद आव्हाड, पत्रकार ज्योती हंगे, डॉ. रावसाहेब घोडेराव, शिक्षिका प्रीती म्हसदे, शिक्षक दादाराव सुखदाने यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली.

# केज व धारूर शहरात बेघर व मनोरुग्ण व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी युवा ग्राम विकास मंडळ व नंददीप फाउंडेशन यांचा महत्वपूर्ण उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**केज (प्रतिनिधी) :** युवा ग्राम विकास मंडळ व नंददीप फाउंडेशन यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने केज शहरातील बेघर व बेवारस व्यक्तींना पुनर्वसन केज शहरातील बेघर व बेवारस व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी युवा ग्राम विकास मंडळ व नंददीप फाउंडेशन यवतमाळ यांनी एक महत्त्वाचा उपक्रम राबविला आहे. केज व धारूर शहरांतील सर्वेक्षणात 13 मनोरुग्ण बेवारस व्यक्तींची नोंद झाली असून, त्यांना योग्य उपचार व पुनर्वसनासाठी



पुढाकार घेण्यात आला आहे.

युवा ग्राम विकास मंडळाने जीवदया प्रेमी कमलेश जी सावला, स्वस्तिक जीवदया ग्रुप अंधेरी मुंबई यांच्याशी संपर्क साधून या बेघर व्यक्तींच्या मदतीसाठी पुढाकार घेतला.

याचाच परिणाम म्हणून, आज युवा मंडळ व नंददीप फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी केज शहरातील 4 मनोरुग्ण रुग्णांना रेस्क्यू करून केज पोलीस स्टेशनच्या मदतीने यवतमाळ येथे रवाना करण्यात आले. त्यांची योग्य तपासणी, आरोग्यसेवा व पुनर्वसन करण्यात येणार आहे.या मोहिमेत कमलेश जी सावला, संतोष रेपे, प्रकाश काळे, सुनीता विभुते, अस्मिता इंगळे व नंददीप फाउंडेशनचे सहकारी यांनी परिश्रम घेतले असून, या रुग्णांना त्यांच्या मूळ घरी पोहोचविण्यापर्यंत ही सेवा सुरू राहील.

> आपणास रस्त्यावर कुठेही मनोरुग्ण अथवा बेघर व्यक्ती आढळल्यास, कृपया युवा ग्राम विकास मंडळ केज शी संपर्क करा.
> -एच पी देशमुख-

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात ‘राष्ट्रीय गणित दिवस’ उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात २२ डिसेंबर रोजी महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय गणित दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गणितातील अनंत मालिका आणि संख्या सिद्धांतामध्ये रामानुजन यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची दखल घेऊन, विद्यार्थ्यांमध्ये या विषयाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे गणित शिक्षक सुनील तांबे, प्रफुल्ल कळम व राजेश ठोंबरे यांनी श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी ढोरमारे हिने केले. यावेळी विद्यार्थिनी प्रांजल ढोरमारे व त्रिष्णा भामरे यांनी रामानुजन यांच्या गणितीय विश्लेषणाबद्दल माहिती देताना सांगितले की, त्यांनी संख्या सिद्धांत, अनंत मालिका



आणि सतत अपूर्णांक यांसारख्या क्षेत्रांमध्ये हजारो सूत्रे व प्रमेये मांडून गणिताला एक नवी दिशा दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे म्हणाले की, रामानुजन यांचे कार्य संख्या विभाजन, मॉड्यूलर फॉर्म्स आणि हायपर जिओमेट्रिक सिरीजमध्ये विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांनी मांडलेले सिद्धांत जगभरातील गणितज्ञांना आजही प्रेरणा देत आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, योगेश निंभोरे, भास्कर केरले, सुनील सागरे, राजाभाऊ भोसले, गजानन सपकाळ, विक्की चांदुरकर, डॉ. रमेश काळे, संजय जाधव, जयश्री चापे, महादेवी ठवरे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावात दि. 20 डिसेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडी येथे राष्ट्रीय संत गाडगे महाराज यांची 69 वी पुण्यतिथी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.इंदापूर तालुक्यामध्ये बेलवाडी येथे पहिल्यांदाच श्री संत गाडगे महाराजांची पुण्यतिथी उत्साहात साजरी होत असल्याचे पाहायला मिळाले. श्री संत गाडगे महाराजांच्या जीवनाचा जीवनपट शालेय विद्यार्थ्यांनी आपापल्या भाषणातून उलगडला. यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले की श्री संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य अतिशय मोठे आहे.गाडगे महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलनावरती मोठं काम केलेल आहे ,त्याचबरोबर स्वच्छते विषयी त्यांनी जनतेमध्ये फार मोठी जनजागृती निर्माण केली ,माणसांची सेवा करणे हीच ईश्वरभक्ती असल्याचे सांगितले. यावेळी गाडगे



महाराजांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कोणत्याही खोटेपणाला थारा दिला नाही. नेहमी खरे बोलावे. सर्वत्र स्वच्छता राखावी गोरगरिबांची सेवा करावी ,त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कुष्ठरोग्यांची देखील खूप मोठी सेवा केली. त्यांनी गावोगावी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेच्या आहारी जाऊ नका असे सांगितले . कोणत्याही मंदिरामध्ये देव नसून माणसांमध्ये देव शोधण्याचे महान कार्य श्री संत गाडगे महाराजांनी केल्याचे शालेय विद्यार्थ्यांच्या व उपस्थित मान्यवरांच्या भाषणांमधून बोलले गेले

# संस्कारधनातून संत साहित्याच्या नाट्यरूपांतराचा नवा आयाम

## डॉं मेघा जंगम यांचे पुस्तक प्रकाशनप्रसंगी ह भ प श्रीपाद कुलकर्णी यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** संत साहित्याची अनेक ग्रंथरूप पुस्तके उपलब्ध असली, तरी डॉ. मेघा जंगम बागले यांनी संस्कारधन या ग्रंथातून संत साहित्याचे नाट्यरूपांतर करून त्याला जिवंतपणा दिला आहे. संत साहित्य क्षेत्रासाठी हा एक नवा आयाम असल्याचे प्रतिपादन संत निवृत्तीनाथ संस्थानचे विश्वस्त तथा उद्योजक ह. भ. प. श्रीपाद महाराज कुलकर्णी यांनी केले. निफाड येथे संस्कारधन ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैनतेय विद्यालयाचे विश्वस्त गुरुवर्य वि. दा. व्यवहारे सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशक सुभाष सबनीस, लेखक-



गीतकार सोमनाथ पवार, किर्तनचंद्रिका ह. भ. प. वैजयंती सिन्नरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मान्यवरांचा सत्कार आयोजकांच्या वतीने करण्यात आला. प्रास्ताविकात श्री. नवनाथ सुडके यांनी लेखिका डॉ. मेघा जंगम बागले यांचा जीवनपरिचय करून दिला.

अध्यक्षीय भाषणात वि. दा. व्यवहारे सर यांनी निफाडची भूमी ही नाथ संप्रदायाची असून, याच भूमीतून संस्कारधनसारख्या ग्रंथाची निर्मिती करणाऱ्या डॉ. मेघा जंगम बागले यांच्यासारखी रत्ने घडतात, असे नमूद केले.

लेखिका डॉ. मेघा जंगम बागले यांनी संस्कारधन ग्रंथ लेखनामागील प्रेरणा व आलेले अनुभव कथन केले. यावेळी प्रकाशक सुभाष सबनीस, लेखक-गीतकार सोमनाथ पवार, किर्तनचंद्रिका ह. भ. प. वैजयंती सिन्नरकर आदींनी मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमास निफाड येथील जिल्हा व तालुका न्यायालयातील न्यायाधीश, वकील संघाचे पदाधिकारी, विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, तसेच आप्तेष्ट, हितचिंतक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.